
१०३ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, मंगळवार ९ डिसेंबर, २०२५ • वर्ष-५, अंक-८१, पाने-८, किंमत : ₹ ६
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 81, Marathi - Daily - Pune, 9 December, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
उपमुख्यमंत्रीपदावरून शिंदेंनी नक्की काय उत्तर दिले उद्धव ठाकरेंना?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# वंदे मातरमचे कौतुक करतानाही मोदींचा नेहरूंवरच वार! नेहरूंनी मुस्लिमांपुढे गुडघे टेकले

■ नवी दिल्ली

**‘वंदे मातरम’ या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आज संसदेत विशेष चर्चा करण्यात आली. मात्र, लोकसभेत वंदे मातरमवर बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावरच वार केले. त्यासाठी त्यांनी महात्मा गांधी यांचे कौतुकही केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, वंदे मातरम या गीताचे महात्मा गांधी यांनी कौतुक केले, पण या गीताला मुस्लिमांनी विरोध करताच जवाहरलाल नेहरूंनी मुस्लिमांपुढे गुडघे टेकले आणि वंदे मातरमची मोडतोड केली. देशाचे तुकडे करतानाही हेच झाले.**



**पंतप्रधान** मोदी म्हणाले की, महात्मा गांधी यांनी वंदे मातरम गीताचे कौतुक करीत ते राष्ट्रगीताच्या दर्जाचे आहे असे म्हटले होते. पण १५ ऑगस्ट १९३७ रोजी महंमद अली जिना यांनी लखनौमधून वंदे मातरमच्या विरोधात नारा दिला, तेव्हा काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आसन डळमळीत होईल, अशी भीती वाटली. मुस्लीम लीगच्या तथ्यहीन आक्षेपांना नेहरूंनी जोरदार प्रत्युत्तर देणे अपेक्षित होते. वंदे मातरमच्या प्रति काँग्रेसची आणि आपली स्वतःची निष्ठा प्रगट करणे आवश्यक होते. पण झाले उलटेच. नेहरुंनी वंदे मातरमची पडताळणी करायला हवी असे म्हटले. जिनांच्या विरोधानंतर पाच दिवसांनी नेहरूंनी २० ऑक्टोबर रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांना पत्र लिहिले. या पत्रात त्यांनी वंदे मातरममुळे मुस्लिमांच्या धार्मिक भावना दुखावू शकतात, असे म्हणत आपण जिनांच्या मतांशी सहमत असल्याचे स्पष्ट लिहिले. मुस्लीम समाज भडकेल, अशी भीतीही व्यक्त केली. त्यानंतर २६ ऑक्टोबर रोजी कोलकाता येथेच काँग्रेसच्या अधिवेशनात वंदे मातरमच्या उपयुक्ततेवर चर्चा झाली. त्याच अधिवेशनात काँग्रेसने वंदे मातरमबाबत तडजोड केली. वंदे मातरमचे तुकडे करण्यास मान्यता दिली. नेहरू आणि काँग्रेसने गुडघे टेकले. त्याचा परिणाम होऊन पुढे देशाचे तुकडे करणेदेखील काँग्रेसला स्वीकारावे लागले.

वंदे मातरमचे महात्म्याबद्दल बोलताना मोदी म्हणाले की, वंदे मातरम हे गीत बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ मध्ये लिहिले. त्याला १८५७ साली झालेल्या स्वातंत्र्यसमराची पार्श्वभूमी आहे. १८५७ च्या स्वातंत्र्यसमरामुळे इंग्रज बिथरून गेले होते. भारतीयांवर अनन्वित अत्याचार केले जात होते. भारताला आळशी, कामचुकार लोकांचा देश म्हटले जात होते. भारताची जमेल तेवढी नालस्ती इंग्रजांकडून केली जात होती. इंग्रजांचे ‘गॉड सेव्ह द क्वीन’ हे गीत भारतीयांच्या घराघरांत पोहोचवण्याचे षड्यंत्र रचले जात होते. अशा निराशात्मक वातावरणात बंकिमचंद्र यांनी ‘वंदे मातरम’ हे काव्य लिहिले. संपूर्ण जगात ‘वंदे मातरम’सारखे भावकाव्य कुठेही नाही. हे गीत संपूर्ण जगासाठी एक आश्चर्य बनून राहिले. गल्लीबोळात हे गीत स्वातंत्र्याचा नारा बनले. त्यामुळे बिथरलेल्या इंग्रजांनी ‘वंदे मातरम’वर कायद्याने बंदी आणली. ‘वंदे मातरम’चा उच्चार करणे, छापणे आणि अगदी हे दोन शब्द बोलणे हा देखील गंभीर गुन्हा ठरवला गेला. त्यावर कठोर शासन केले जाऊ लागले. ‘वंदे मातरम’ हे दोन शब्द देशाच्या स्वातंत्र्याचा मंत्र बनले होते. हे स्वातंत्र्य म्हणजे केवळ इंग्रज निघून जावेत आणि देशावर स्वदेशींची सत्ता यावी एवढ्यापुरते मर्यादित नव्हते, तर त्यापलीकडे जात भारताला स्वयंपूर्णतेचा मार्ग दाखवणारे दिशादर्शक होते. स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे भावनात्मक नेतृत्व या महान गीताने केले. हे गीत म्हणजे हजारो वर्षांपासून पान ५ वर

# पार्थ पवार प्रकरणी निलंबित तहसीलदाराने ८५ लाख रोख भरले

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्याशी संबंधित मुंढवा भूखंड घोटाळ्यात आरोपी असलेले निलंबित तहसीलदार सूर्यकांत येवले यांनी सातारा जिल्ह्यातील खंडाळा येथील नागेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची आपल्या कुटुंबियांच्या नावे असलेली सुमारे ८५.५० लाख रुपयांची थकबाकी रोख स्वरूपात भरली आहे. एका सरकारी अधिकाऱ्याकडे एवढी रोख रक्कम कुठून आली, असा सवाल सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार व अंजली दमानिया यांनी उपस्थित करत चौकशीची मागणी केली आहे. हा सरळसरळ मनी लाँड्रिंगचा प्रकार असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.**



■ पुणे

**विजय** कुंभार यांनी आज सोशल मीडियावर एक पोस्ट करून हा मुद्दा उपस्थित केला. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, मुंढवा जमीन घोटाळ्यातील आरोपी निलंबित तहसीलदार सूर्यकांत येवले याने कुटुंबियांची पतसंस्थेची ८५.५० लाख रुपयांची थकबाकी रोख भरली. मुंढवा प्रकरण सुरू असतानाच ही रक्कम भरली गेली आहे. एका सरकारी अधिकाऱ्याकडे एवढी रोख रक्कम आली कुठून? हा सरळ सरळ भ्रष्टाचार आणि मनी लाँड्रिंगचा प्रकार दिसतो. ईडी व सरकारने तत्काळ चौकशी करून दोषींना अटक करावी.

कुंभार यांनी या प्रकरणी अंजली दमानियांसोबत प्रशासनाला एक निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, सूर्यकांत येवले यांनी जमा केलेल्या ८५.५० लाखांच्या मूळ स्त्रोताची अतिशय सखोल, निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. या व्यवहारात सहभागी नागेश्वर नागरी सहकारी पतसंस्था, तिचे पदाधिकारी व कर्मचारी यांच्या भूमिकेची चौकशी करावी. हा व्यवहार पान ७ वर




## थायलंडचा कंबोडियावर हल्ला शिवमंदिराचा वाद चिघळला

**बँकॉक** - थायलंड आणि कंबोडिया यांच्यातील सीमावाद पुन्हा एकदा चिघळला. आज सकाळी थायलंडने कंबोडियाच्या हद्दीत हवाई हल्ला केला. दोन महिन्यांपूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुढाकाराने दोन्ही देशांमध्ये युद्धविराम करार झाला होता. त्याआधी पाच दिवस झालेल्या चकमकीत ३० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता.

# आदित्य ठाकरेंना विरोधी पक्षनेतेपद? आमदार भास्कर जाधवांना डावलणार

■ मुंबई

**महाविकास** आघाडीमध्ये विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून ज्येष्ठ आमदार भास्कर जाधव यांचे नाव चर्चेत होते. मात्र आता भास्कर जाधव यांना डावलून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे पुत्र आणि युवा नेते आदित्य ठाकरे यांच्या नावाची शिफारस विधिमंडळ अध्यक्षांकडे पाठवण्यात आली असल्याची जोरदार चर्चा आहे. यावरून सत्ताधाऱ्यांनी आज भास्कर जाधव यांना खिजवले. तर शिंदे सेनेने आदित्य यांच्या



नावाला विरोध केला आहे. स्वतः आदित्य ठाकरे यांनी या केवळ अफवा असल्याचे सांगून ही शक्यता फेटाळून लावली.

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाची आज सुरुवात झाली. महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या इतिहासात पहिल्यांदाच विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही सभागृहांत विरोधी पक्षनेतेपद नाही. यामुळे अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच विरोधकांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. दुसरीकडे सत्ताधाऱ्यांचा दावा आहे की, नियमांप्रमाणे हा निर्णय अध्यक्ष आणि सभापती यांनी घ्यायचा असून त्यात सरकारचा पान ७ वर

# नाशिक पालिका व वृक्षप्रेमींची बैठक निष्फळ

■ नाशिक

**तपोवन** वृक्षतोड संदर्भात आज नाशिक मनपा अधिकारी आणि पर्यावरणप्रेमी यांची बैठक झाली. यावेळी पालिका अधिकाऱ्यांनी तपोवन वृक्षतोडी केली जाणार असे स्पष्ट केले तर आंदोलक एकही झाड तोडले जाऊ नये यावर ठाम राहिले. यामुळे मार्ग निघाला नाही. दरम्यान आज पर्यावरणप्रेमी अभिनेते सयाजी शिंदे यांनी राज ठाकरे यांची मुंबई निवासस्थानी भेट घेतली. यामुळे दोघे हे आंदोलन पुढे कसे नेतात याकडे सर्वांचे लक्ष आहे.

आजच्या पालिकेच्या बैठकीत मोजक्या

**राज ठाकरे- सयाजी शिंदे भेट**



लोकांनाच आमंत्रित केल्याचे पर्यावरणप्रेमींनी सांगितले. नाशिक मनपा आयुक्त मनीषा खत्री आणि अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर बैठकीला उपस्थित होत्या. या बैठकीनंतर आयुक्त मनीषा खत्री यांनी सांगितले की, लहान झाडे किंवा झुडपे तोडावी लागतील. आराखड्यानुसार आमच्या सर्वेक्षणात त्या झाडांची संख्या १८०० आहे. कमीत कमी झाडे तोडण्याचा पालिकेचा प्रयत्न आहे. अधिकाऱ्यांनी जनसुनावणी घेतली आहे. ते हरकती आणि सर्व बाबींचा अहवाल तयार करणार आहेत. यासंदर्भात कारवाई सुरू आहे. अहवाल मिळाल्यानंतर वृक्षप्राधिकरणाची बैठक होईल. त्यामध्ये तोडल्या जाणाऱ्या झाडांची अंतिम संख्या ठरेल. या सर्व गोष्टी सार्वजनिक केल्या जाणार आहेत.

गोदा सेवा समितीचे अध्यक्ष देवांग जानी म्हणाले की, पालिका पान ७ वर

# नवी मुंबई विमानतळाच्या नावासाठी भूमिपुत्रांची २२ डिसेंबरपासून दिंडी

■ नवी मुंबई

**नवी मुंबई** आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव द्यावे या भूमिपुत्रांच्या जुन्या मागणीसाठी पायी दिंडीचे आयोजन केले आहे. २० डिसेंबरपर्यंत निर्णय न झाल्यास २२ डिसेंबरला भिवंडी ते नवी मुंबई विमानतळ अशी पायी दिंडी काढली जाईल. २५ डिसेंबरपासून विमानतळावरून एकही विमान उडू देणार नसल्याचा इशारा खा. सुरेश म्हात्रे यांनी केंद्र सरकारला दिला.

राज्य सरकारने दि.बा. पाटील यांचे नाव विमानतळाला देण्याचा ठराव मंजूर करून केंद्राकडे पाठवला. मात्र केंद्र सरकारकडून अद्याप निर्णय न झाल्यामुळे भूमिपुत्र पुन्हा आक्रमक झाले आहेत. विमानतळावरून या महिन्यात उड्डाणे सुरू होणार असल्याने आता आंदोलन केले जाणार आहे. कार रॅलीनंतर आता पदयात्रेची घोषणा झाली आहे. भिवंडीतील मानकोली नाका ते नवी मुंबई विमानतळ या मार्गावर पायी दिंडी काढण्यात येणार आहे. या दिंडीचे समन्वयक निलेश पाटील यांनी या पदयात्रेचा सविस्तर मार्ग जाहीर केला.

यानुसार २२ डिसेंबर रोजी सकाळी मानकोली नाका, भिवंडी येथून पायी दिंडी निघणार आहे. सुरुवातीला किमान २५ हजार भूमिपुत्र सहभागी होतील. दुपारच्या भोजनासाठी ठाण्यातील खारेगाव येथे विसावा घेतला जाईल. त्यानंतर सायंकाळी सुमारे १५ किमी अंतर पान ७ वर

# अधिवेशनात ७५ हजार कोटी पेक्षा जास्त रकमेच्या पुरवणी मागण्या सादर

■ नागपूर

**विधिमंडळ** अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारच्या वित्त विभागाने ७५ हजार कोटी पेक्षा जास्त रकमेच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. या पुरवणी मागण्यांमध्ये राज्य सरकारकडून आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी, १५६४८ कोटी पदुम आणि कृषी ४५४ कोटी, शालेय शिक्षण व अन्य मागास घटकांच्या शुल्कात २३८५ कोटी, नगरविकास कामगार कौशल्य सामाजिक कल्याण ६५५९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली



आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी सात कोटी, सामान्य प्रशासन (सार्वजनिक बांधकाम विभाग) १६२ कोटी, माहिती आणि प्रसिध्दी विभागासाठी २० कोटी, गृहविभागाच्या न्यायदान पोलीस प्रशासकीय सेवेसाठी ५७७ कोटी, जलपरिवहन साठी २०३५ कोटी, रेल्वे धोरण संचलन १६१ कोटी, महसूल विभाग १२ कोटी, सा.बां. खात्यासाठी ४५३ कोटी, उद्योग ऊर्जा कामगार विभागासाठी ९१०५ कोटी, ग्रामविकाससाठी ६९१ कोटी, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य २०८४ कोटी, नियोजन पान ५ वर

# बेळगावात हिवाळी अधिवेशन मराठी मेळाव्याला परवानगी नाही

■ बेळगाव

**कर्नाटक** विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाला आज बेळगावात सुरुवात झाली. यावेळी सीमाभागात पुन्हा एकदा तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मराठी हक्कांसाठी महामेळावा आयोजित केला जातो. यंदा मोठ्या संख्येने मराठी बांधव सहभागी होणार होते. परंतु संभाव्य विरोधाची भीती व्यक्त करत कर्नाटक सरकारने महामेळाव्याला परवानगी नाकारली. त्यानंतर आंदोलने रोखण्यासाठी मराठी एकीकरण समितीच्या नेत्यांना अटक करण्यात आली.

या निर्णयाचा महाराष्ट्रातही निषेध व्यक्त होत आहे. उबाठा कार्यकर्त्यांनी कोल्हापूर एसटी स्टँड येथे कर्नाटक परिवहनच्या बस अडवून आंदोलन केले. मराठी जनतेच्या आवाजाला दडपण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला. दरम्यान, हिवाळी अधिवेशनासाठी ८ ते १८ डिसेंबरदरम्यान बेळगावात मोठ्या प्रमाणावर तयारी केली आहे. सुरक्षा, निवास व वाहतूक व्यवस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने ४.५ कोटी खर्चून उभारलेले नवे उद्यान आणि सजावटीचे कारंजे याचे मुख्यमंत्री सिद्धरामैया यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. शहरातील हॉटेल आणि रिसॉर्टमधील सुमारे ३,५०० खोल्या आरक्षित केल्या आहेत.

# इंडिगो उड्डाणे रद्द प्रकरणात सुप्रीम कोर्टाचा हस्तक्षेपास नकार

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ नवी दिल्ली

**इंडिगो एअरलाईन्सची उड्डाणे रद्द झाल्याने उडालेल्या गोंधळाबद्दल सर्वोच्च न्यायालयाने आज चिंता व्यक्त केली. मात्र तातडीने हस्तक्षेप करण्यास नकार दिला.**

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने म्हटले की, विमानतळांवर अनेक लोक अडकले आहेत आणि काहींना आरोग्याशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. केंद्र सरकारने प्रकरणाची दखल घेतली असल्याने आत्ताच न्यायालयाचा हस्तक्षेप आवश्यक नाही. सरकारने वेळेवर कारवाई केली आहे आणि परिस्थिती हाताळण्याचे प्रयत्न सुरू आहेत.



सुनावणीवेळी एका वकिलाने सांगितले की, इंडिगोमध्ये अनेक पदे रिक्त आहेत आणि या कारणास्तव प्रवाशांना त्रास होतो आहे. ग्राहकांना योग्य माहिती मिळत नाही, ज्यामुळे गोंधळ अधिक वाढतो.

दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयात या प्रकरणावर दुसरी याचिका दाखल झाली आहे. या याचिकेत प्रवाशांनी तिकिटांचे पैसे परत देण्याची मागणी केली आहे. याचिकेत असेही सांगितले गेले की, विमानतळांवर अडकलेल्या लोकांना कोणतीही मदत मिळत नाही आणि रिफंड प्रक्रियाही होत नाही.

# तुकाराम मुंढेंचे निलंबन करा भाजपा आमदारांची मागणी

■ नागपूर

**राज्याच्या** प्रशासकीय वर्तुळात नेहमीच कडक कार्यपद्धतीसाठी चर्चेत राहणारे ज्येष्ठ आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे पुन्हा अडचणीत आले आहेत. या हिवाळी अधिवेशनात भाजपाचे आमदार मुंढेंविरोधात विशेष लक्षवेधी सूचना मांडून त्यांच्या निलंबनाची मागणी करणार असल्याची चर्चा आहे.

नागपूर महानगरपालिकेत त्यांच्या जुन्या कार्यकाळातील वादग्रस्त निर्णय पुन्हा उकरले जाणार असल्याने अधिवेशन गाजण्याची शक्यता आहे. भाजपाचा मुख्य आरोप आहे की, नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त असताना मुंढेंनी नियमबाह्य पद्धतीने स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा प्रभार स्वतःकडे घेतला. या पदावर असताना काही कंत्राटदारांना कोट्यवधी रुपयांचे नियमबाह्य पेमेंट केले गेले. काही महिला अधिकाऱ्यांना दमदाटी केली.

# ‘सनबर्न फेस्टिव्हल’साठी पोर्ट ट्रस्टची जागा शासनाने २ कोटी १६ लाख डिपॉझिट घेतले

■ मुंबई

**ऐतिहासिक** वांद्रे किल्ल्यावर शासनाच्या पर्यटन विभागाकडून दारू पार्टी आयोजन केल्याचे प्रकरण ताजे असताना गोव्यातील वादग्रस्त ‘सनबर्न फेस्टिव्हल’साठी खास शिवडी येथील मुंबई पोर्ट ट्रस्टची जागा भाड्याने देण्यात आली आहे. त्यासाठी २ कोटी १६ लाख रुपये डिपॉझिट भरले असल्याचा दावा नशा विरोधी संघर्ष अभियानाने केला आहे. या सनबर्नला हिंदू जनजागृती समितीचा तीव्र विरोध आहे. फडणवीस सरकारने बंदी न घातल्यास ‘सनबर्न’ उधळून लावण्याचा इशारा नशा विरोधी संघर्ष अभियानाने दिला आहे.

**कार्यक्रम उधळण्याचा इशारा**



नशा विरोधी संघर्ष अभियानाच्या धनश्री केळशीकर, मोकळा श्वासचे संयोजक राजेश सावंत, प्रा. श्रीपाद सामंत, हिंदू जनजागृती समितीच्या वकील मृन्मयी खोडवेकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

१९ ते २१ डिसेंबर दरम्यान शिवडी येथे ’सनबर्न फेस्टिव्हल’ होत आहे. सर्व परवानग्या मिळण्यापूर्वी जोरदार ऑनलाईन तिकिट विक्री सुरू आहे. श्रीमंत पान ७ वर

# तरुणीने कृष्णाच्या मूर्तीसोबत विधिपूर्वक विवाह केला

■ लखनौ

**उत्तर** प्रदेशच्या बदायूँमधून एका विलक्षण विवाह सोहळ्याने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. येथे एका २८ वर्षीय तरुणीने सर्व पारंपरिक विवाहविधी पार पाडत भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीसोबत लग्न केले. या अनोख्या विवाहसोहळ्याला तरुणीचे नातेवाईक आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. पिंकी शर्मा असे या तरुणीचे नाव आहे. बदायूँच्या बियोर कसीमाबाद या खेडेगावातील कृष्ण मंदिरात हा विवाह सोहळा पार पडला. या सोहळ्यामध्ये कन्यादान आणि अग्निभोवती सात फेरे वगैरे सर्व पारंपरिक विवाह विधी पार पाडण्यात आले. पिंकी ही बालपणापासून कृष्णाची निस्सीम भक्त आहे. तिने आपल्या आई-वडिलांसह अनेकदा वृंदावनमध्ये जाऊन श्रीकृष्णाचे दर्शन घेतले आहे. पिंकीने मास्टर्स इन एज्युकेशन (एमएड) ही पदव्युत्तर पदवी संपादित केली आहे. चार महिन्यांपूर्वी तिला कृष्ण मंदिराच्या व्यवस्थापनाने प्रसाद म्हणून सोन्याची अंगठी दिली. तेव्हापासून तिचे जीवनच बदलून गेले. ही अंगठी म्हणजे दैवी संकेत आहेत असे तिला वाटू लागले.

# पत्नीला वाचवून मेहुणींसाठी आगीत शिरलेला पती व तिघी भगिनींचा अंत

■ पणजी

**गोवा** येथे सुट्टीत मौज करण्यासाठी गेलेल्या दिल्लीतील एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. गाझियाबाद आणि नवी दिल्ली येथील जोशी कुटुंब गोव्यात तीन दिवसांपासून सुट्टीचा आनंद घेत होते. शनिवारी ते बिर्च बाय रोमिओ या क्लबमध्ये गेले. दुर्दैवाने त्यांनी क्लबमध्ये प्रवेश केल्यानंतर काही मिनिटांतच आग लागली. आग लागल्यानंतर विनोद कुमार यांनी सर्वात आधी आपली पत्नी भावना जोशी यांना मुख्य प्रवेशद्वारातून बाहेर ढकलले. त्या सुखरूप बाहेर पडल्या. पण त्यांच्या तीन बहिणींना वाचवायला विनोद कुमार पुन्हा आत गेले. मात्र त्यांचे पती आणि बहिणी आतच अडकले होते. बायकोच्या तिघी बहिणींना वाचवण्यासाठी विनोद कुमार जीवाची पर्वा न करता पुन्हा आगीत शिरले. मात्र विनोद व भावनाच्या तिन्ही बहिणी आगीत ठार झाल्या. या क्लबचे मालक सौरव लुथरा यांनी आज सोशल मीडियावर पोस्ट करून प्रतिक्रिया दिली की, आम्हाला या घटनेने पुरते हादरलो आहोत.

देश विदेश

# बेनिनमध्ये लष्करी उठाव! सरकार बरखास्तीची घोषणा

■ पोर्तो-नोव्हो



**पश्चिम** आफ्रिकेतील बेनिन देशात लष्कराने सरकारी टेलिव्हिजनवर येऊन सरकार बरखास्त केल्याचे जाहीर केले. पश्चिम आफ्रिकेत काही वर्षांपासून लष्करी उठाव वारंवार होत आहेत आणि हा त्यापैकीच एक नवीन प्रकार आहे. याआधीही अनेक आफ्रिकन देशांमध्ये सैन्याने अशा प्रकारे सत्ता ताब्यात घेतली. स्वतःला 'मिलिट्री कमिटी फॉर रिफाऊंडेशन' (पुनर्बांधणीसाठी लष्करी समिती) म्हणवणाऱ्या सैनिकांच्या गटाने राष्ट्राध्यक्ष आणि सर्व सरकारी संस्था बरखास्त केल्याची घोषणा केली. सैनिकांनी सांगितले की, लेफ्टनंट कर्नल पास्कल टिग्री यांना लष्करी समितीचे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. बेनिन हा देश १९६० मध्ये फ्रान्सपासून स्वतंत्र झाला. त्यानंतर सुरुवातीच्या काळात या देशात अनेक लष्करी उठाव झाले होते. १९९१ मध्ये मार्क्सवादी-लेनिनवादी नेते माथ्यू केरेकू यांचा दोन दशकांचा कार्यकाळ संपल्यानंतर देशात राजकीय स्थैर्य आले होते. केरेकू यांनीच देशाचे नाव बदलून 'पीपल्स रिपब्लिक ऑफ बेनिन' असे ठेवले होते. राष्ट्राध्यक्ष पेट्रिस तालों २०१६ पासून सत्तेत होते आणि एप्रिलमध्ये होणाऱ्या राष्ट्राध्यक्षपद निवडणुकीनंतर ते पद सोडणार होते. त्यांच्या पक्षाचे उमेदवार, माजी अर्थमंत्री रोमुआल्ड वाडाग्नी हे निवडणुकीत जिंकण्याची दाट शक्यता होती.

# गीता वाचन विरुद्ध कुराण पठण! पश्चिम बंगालचे राजकारण

■ कोलकाता



**आगामी** सन २०२६ मध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालमध्ये धार्मिक ध्रुवीकरण मोठ्या जोमात सुरू झाले आहे. एकीकडे हिंदू सनातन संस्कृती संसदने पाच लाख लोकांकडून सामूहिक गीता वाचनाचा कार्यक्रम आयोजित केला. तर त्याला प्रत्युत्तर म्हणून तृणमूल काँग्रेसचे बडतर्फ आमदार हुमायून कबीर यांनी एक लाख मुस्लिमांकडून कुराण पठण करण्याची घोषणा केली. रविवारी कोलकातामधील प्रसिध्द ब्रिगेड परेड मैदानावर सनातन संस्कृतीच्या वतीने आयोजित केलेल्या सामूहिक गीता वाचनाच्या कार्यक्रमाला अनेक साधू - संतांसह भारतीय जनता पार्टीचे (भाजपा) अनेक खासदार आणि मंत्री उपस्थित होते. भाजपा खासदार आणि राज्यमंत्री सुकांता मुझुमदार या कार्यक्रमाला उपस्थित होते. हा कार्यक्रम म्हणजे हिंदू एकतेचे सुचिन्ह आहे, असे मुझुमदार म्हणाले. तर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष खासदार समिक भट्टाचार्य यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर हिंदूविरोधी असल्याची टीका केली.

# इराणच्या किश बेटावर मॅरेथॉन दोन आयोजकांना अटक

■ तेहरान

**इराणच्या** किश बेटावर झालेल्या मॅरेथॉनमध्ये महिला स्पर्धकांनी हिजाब किंवा स्कार्फशिवाय धावल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यानंतर मॅरेथॉनच्या २ आयोजकांना नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल अटक केली.

या मॅरेथॉनमध्ये २००० महिला आणि ३००० पुरुषांनी सहभाग घेतला होता. मॅरेथॉनमध्ये धावणाऱ्या अनेक महिला सहभागी हिजाब किंवा स्कार्फशिवाय धावताना दिसल्या. त्यांचे लाल टी-शर्ट परिधान केलेले फोटो सोशल मीडियावर वाऱ्यासारखे व्हायरल झाले आणि या घटनेमुळे इराणमध्ये धार्मिक कट्टरपंथी गटांसह इराण सरकारने कठोर भूमिका घेतली. न्यायव्यवस्थेने तत्काळ निवेदन जारी करत या कार्यक्रमाच्या दोन आयोजकांना अटक केली.

# नव्या जी-२० परिषद यादीतून दक्षिण आफ्रिकेला वगळले

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेने** पुढील वर्षी मियामी शहरात होणाऱ्या जी-२० शिखर परिषदेच्या तयारी अंतर्गत एका मोठ्या बदलाची घोषणा करत नव्या जी-२० चा आराखडा सादर केला आहे. या नव्या स्वरूपात पोलंडला सदस्य करण्यात आले असून, दक्षिण आफ्रिकेला वगळण्यात आले. दक्षिण आफ्रिकेत पार पडलेल्या जी-२० शिखर परिषदेत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भाग घेण्यास नकार दिला होता. त्यानंतर दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये कटूता निर्माण झाली. दक्षिण आफ्रिका स्वत:च्या अध्यक्षत्वादरम्यान 'द्वेष, विभाजन आणि कट्टरवादी अजेंड्या'ला प्रोत्साहन देत असल्याचा आरोप अमेरिकेचे विदेशमंत्री मार्को रुबियो यांनी केला. २०२६ची शिखर परिषद अमेरिकेत होणार आहे. २००९ नंतर पहिल्यांदाच अमेरिका या परिषदेचे आयोजन करणार असल्याचे रुबियो यांनी म्हटले आहे.

# तक्रार देण्यासाठी आलेल्या महिलेवरच बलात्कार! पोलीस हवालदाराला अटक

■ डहाणू

**पोलीस** ठाण्यात तक्रार देण्यासाठी आलेल्या एका महिलेवर पोलीस हवालदारानेच बलात्कार केल्याची खळबळजनक घटना पालघर जिल्ह्यातील डहाणू येथे घडली आहे. याप्रकरणी कासा पोलीस ठाण्यातील हवालदारावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. पीडित महिलेने कासा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने ती कासा पोलीस ठाण्यात जात होती. मात्र तेथील पोलीस हवालदाराने तक्रारदार महिलेला पोलीस ठाण्याच्या मागे असलेल्या पोलीस वसाहतीत नेऊन तिच्यावर बलात्कार केला. या प्रकरणी पीडित महिलेने रविवारी डहाणू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. कासा पोलीस ठाण्यात आरोपी हवालदाराच्या विरोधात बलात्कारासह विविध कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पालघरचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. कासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अविनाश मंडले यांची पोलीस मुख्यालयात बदली केली आहे. डहाणूच्या विभागीय पोलीस उपअधीक्षक अंकिता कणसे यांच्यामार्फत संपूर्ण घटनेची चौकशी करण्यात येत आहे.

# अजित पवार गटाच्या उपाध्यक्षा गीता हिंगे यांचे अपघाती निधन

■ गडचिरोली

**राष्ट्रवादी** काँग्रेस अजित पवार गटाच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा गीता हिंगे यांचे मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात निधन झाले. नागपूरवरून गडचिरोलीला परत येत असताना पाचगाव परिसरात त्यांच्या वाहनाला समोरून येणाऱ्या कारने जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की, त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. त्यांचे पती सुशील हिंगे यांच्या हाताला किरकोळ दुखापत झाली. तर चालकही जखमी झाला. स्थानिकांनी तत्काळ मदत करून जखमींना रुग्णालयात दाखल केले.

गीता हिंगे या गडचिरोलीतील सक्रिय आणि प्रेरणादायी नेत्या म्हणून ओळखल्या जात होत्या. त्यांनी राजकारणाची सुरुवात भाजपातून केली होती. त्यांनी भाजपाच्या जिल्हाध्यक्ष आणि जिल्हा महामंत्री म्हणून काम पाहिले होते. नगराध्यक्षपदाचे तिकीट नाकारल्याने त्यांनी २६ नोव्हेंबर रोजी भाजपा सोडून अजित पवार गटात प्रवेश केला. पक्षाने त्यांची महिला प्रदेश उपाध्यक्षा म्हणून नियुक्ती केली होती.

# आणखी एका बीएलओचा हृदयविकाराने मृत्यू

■ भोपाळ

मध्य प्रदेशच्या सागर जिल्ह्यातील निवारी येथील प्राथमिक शाळेतील शिक्षिका आणि बीएलओ लक्ष्मी जारोलिया यांचे उपचारादरम्यान निधन झाले. सुमारे दहा दिवसांपूर्वी त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता. सागर तसेच भोपाळ येथील खासगी रुग्णालयांत उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली. लक्ष्मी यांचा मुलगा देवांशु जारोलिया यांनी आरोप केला आहे की, एसआयआर सर्वेक्षणाचे प्रचंड काम, तांत्रिक अडचणी आणि सततच्या दबावामुळे आई प्रचंड मानसिक तणावाखाली होती. मोबाईल व्यवस्थित चालत नसल्याने माहिती अपलोड करण्यात अडथळे येत होते. तरीही सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत अहवाल, फॉर्म भरणे आणि डेटा पाठवण्याचा तगादा लावला जात होता. या अतिरिक्त कामाच्या ताणामुळेच आईची तब्येत अत्यंत बिघडली. अखेर तिला हृदयविकाराचा झटका आला. रहली तहसीलदार राजेश पांडे यांनी मात्र स्पष्ट केले की, शिक्षिका २०२१ पासून हृदयविकाराची रुग्ण असून, तिच्यावर उपचार सुरू होते. त्यामुळे मृत्यू एसआयआरच्या कामाच्या ताणामुळे झाला, असा आरोप चुकीचा असून हृदयविकाराच्या झटक्यानेच मृत्यू झाला. दरम्यान, बीएलओंवर वाढलेला कामाचा ताण हा गंभीर चर्चेचा विषय ठरत असून, यापूर्वीही मध्य प्रदेशात अशाच तणावाखाली किमान सात बीएलओंचा मृत्यू झाल्याचा दावा आहे.

# छ. संभाजीनगर स्थानकावर उर्दू नामफलकाच्या मागणीसाठी आंदोलन

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर रेल्वे स्थानकाच्या नामफलकावर शहराचे नाव उर्दू भाषेत लिहावे, या मागणीसाठी सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया (एसडीपीआय)च्या कार्यकर्त्यांनी आज आंदोलन केले. आंदोलक रेल्वे स्थानक परिसरात घुसून रेल रोको करण्याच्या तयारीत होते. मात्र पोलिसांनी त्यांना स्थानकाच्याच प्रवेशद्वारावरच रोखून ताब्यात घेतले. एसडीपीआय कार्यकर्त्यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकाचे नामफलक सुरुवातीला मराठी, इंग्रजी आणि उर्दू अशा तीन भाषांमध्ये होते. मात्र भाजपा नेते आणि आमदार संजय केंडे यांनी उर्दूला विरोध व्यक्त केल्यानंतर रेल्वे प्रशासनाने नामफलकावरील उर्दू नाव काढून टाकले.

# नेटफ्लिक्स-वॉर्नर करार धोकादायक! ट्रम्प यांची चिंता

■ वॉशिंग्टन




**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नेटफ्लिक्स आणि वॉर्नर ब्रदर्समधील मोठ्या कराराबद्दल चिंता व्यक्त केली. त्यांनी दावा केला की, हा करार धोकादायक आहे. या करारामुळे नेटफ्लिक्सचे बाजारातील वर्चस्व आणखी वाढेल. त्यामुळे ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, ते या कराराशी संबंधित निर्णयात स्वतः सहभागी असतील. ट्रम्प म्हणाले की, नेटफ्लिक्सचा बाजारातील हिस्सा आधीच खूप जास्त आहे आणि ही एक समस्या असू शकते. हा करार मध्यम क्षेत्राला हादरवून टाकेल. ओटीटी प्लॅटफॉर्म्सचे वर्चस्व वाढल्याने स्पर्धा कमी होऊ शकते, जे ग्राहकांसाठी योग्य नाही. हॉलिवूडमध्येही या कराराला विरोध केला जात आहे. कारण या करारामुळे 'अँटीट्रस्ट'च्या समस्या निर्माण होऊ शकतात. फेडरल ॲथॉरिटी आता या कराराचे पुनरावलोकन करत आहे. मी या कराराच्या निर्णयात सहभागी राहीन. व्हाईट हाऊसचा या कराराशी थेट संबंध असू शकतो. यावेळी ट्रम्प यांनी नेटफ्लिक्सचे सह-सीईओ टेड सरेंडोस यांचे कौतुकही केले. दरम्यान, फेडरल ॲथॉरिटीने करार मंजूर केला तर नेटफ्लिक्सचा कंटेंट पोर्टफोलिओ आणखी मजबूत होईल. ग्राहकांना एकाच ठिकाणी जास्त कंटेंट मिळू शकेल जे त्यांच्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

मात्र, अँटीट्रस्ट नियमांमुळे करारात विलंब किंवा बदल होण्याची शक्यता आहे. मार्केट तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, ओटीटी क्षेत्रातील एकत्रिकरण सुरूच राहील. पण नियम कडक होतील.

# बार्शी कृषी संस्थेवर राऊत यांचे पॅनल

■ सोलापूर

नगरपरिषद निवडणुकीच्या निकाला आधीच माजी आमदार राजेंद्र विठ्ठल राऊत यांच्या नेतृत्वाखालील बळीराजा विकास आघाडीने बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीवर आपले वर्चस्व दाखवले आहे. या निवडणुकीत उबाठाचे आमदार दिलीप गंगाधर सोपल यांच्या बार्शी बाजार समिती परिवर्तन आघाडीचा पराभव करत राऊत यांच्या पॅनेलने १८ पैकी सर्व १८ जागांवर विजय मिळवत सत्ता कायम राखली. यापैकी २ जागा बिनविरोध निवडून आल्या. यावेळी पारंपारिक प्रतिस्पर्धी उबाठा आमदार दिलीप सोपल आणि माजी आमदार राजेंद्र राऊत आमनेसामने होते. विशेष म्हणजे, यंदाच्या निवडणुकीत सोपल आणि राऊत यांच्या घरातील कोणीही सदस्य उमेदवार नव्हता, हे या निवडणुकीचे वैशिष्ट्य ठरले. मतदानापूर्वीच बळीराजा विकास पॅनेलमधील व्यापारी मतदारसंघातील दोन उमेदवार बिनविरोध विजय झाले होते.



राज्यातील लोककलावंत आणि लोककलेसंदर्भात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल लोककलेचे अभ्यासक, पत्रकार खंडुराज गायकवाड यांना राज्य सरकारच्या सांस्कृतिक विभागाचा सांस्कृतिक पुरस्कार देऊन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सन्मानित केले. खंडुराज गायकवाड यांच्या मातोश्री श्रीमती छबूबाई शंकर गायकवाड, कन्या दीक्षिता हेही यावेळी उपस्थित होते. खंडुराज गायकवाड यांचा विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

# शिंदेसेनेचे २२ आमदार भाजपाच्या गळाला! आदित्य ठाकरेंचा दावा

■ नागपूर

**शिवसेनेचे** २२ आमदार भाजपाच्या गळाला लागले आहेत, असे खळबळजनक वक्तव्य शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केले. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच विधान भवन परिसरात पत्रकारांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले की, राज्यात नियमबाह्य बनलेल्या एका पक्षात दोन गट पडले आहेत. त्यापैकी एका गटातील २२ आमदार उडी मारण्याच्या तयारीत आहेत. आदित्य ठाकरे म्हणाले की, राज्यात गद्दारी करून एक नियमबाह्य पक्ष बनला. या पक्षाचे आता दोन गट पडले आहेत. त्यापैकी २२ जण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गळाला लागले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरून हे सर्व आमदार उठतात आणि बसतात.

### चंद्रकांत खैरे यांचाही दावा

ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदेंच्या नाराजीचा दाखला देत शिंदेंचे २० आमदार भाजपात जाणार असल्याचा दावा केला होता. ते म्हणाले होते की, शिंदे गटाचे आमदार भाजपात जाणार असल्याच्या बातम्यांमुळे शिंदे नाराज झालेत. त्यांचे २० आमदार मागेच त्यांना सोडण्यासाठी तयार झाले होते. माझ्या मते ते भाजपामध्ये जाण्यासाठी शिवसेना सोडतील. मला त्यांचे काही लोक भेटले.

विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्र्यांनी त्याबाबत इशारा दिला होता. हा इशारा कुणाला होता?

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे २२ आमदार भाजपाच्या गळाला लागले आहेत, असे वक्तव्य आदित्य ठाकरे यांनी केल्यानंतर त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. फडणवीस म्हणाले की, शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार भाजपात घेऊन काय करायचे? ते आमचेच आहेत. शिंदेंची शिवसेना ही आमचा मित्रपक्ष आहे. तीच खरी शिवसेना आहे. आमच्या मित्रपक्षाचे आमदार आमच्याकडे घेण्याचे राजकारण आम्ही कधीही करत नाहीत. उलट शिंदेंची शिवसेना आणखी मजबूत झाली पाहिजे यासाठी आम्ही शिवसेनेच्या पाठीशी आहोत. भविष्यात नक्कीच भाजपा, शिवसेना आणि आमची महायुती आणखी मजबूत होताना दिसेल. आदित्य ठाकरे यांचे जे २० आमदार आहेत तेही भाजपाच्या गळाला लागले आहेत, असे कोणाच्या म्हणण्याने होत नाही.

**आदित्य ठाकरे ज्योतिषी आहेत का?**

या दाव्यानंतर शिंदे गटाच्या आमदारांचा एक गट भाजपामध्ये जाणार असल्याच्या चर्चेचे पेव फुटले. पण शिवसेना आमदार नीलेश राणे यांनी त्यांचा हा दावा फेटाळला. ते म्हणाले, आदित्य ठाकरे ज्योतिषी आहेत का? त्यांचे आमदार किती राहिलेत? त्यांचे वीसच आमदार राहिले आहेत.

# नेताजी-टागोरांचा आदर नाही मग कोणाचा आदर करता?

### ममता बॅनर्जी यांची टीका

■ कोलकाता

संसदेत वंदे मातरमवरून सुरू असलेल्या जोरदार चर्चेदरम्यान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपवर टीका केली. ममता बॅनर्जी यांनी भाजपाला सवाल केला आहे की, भाजपा पक्ष नेताजी, टागोर आणि राजाराम मोहन रॉय यांचे कौतुक करत नसेल, तर मग पक्ष कोणाचे कौतुक करतो? कोलकाता येथे पत्रकार परिषदेदरम्यान त्यांनी प्रश्न केला की, भाजपामधील काही लोक नेताजींची कदर करत नाही, असे म्हणताना मी ऐकले आहे. कोलकाता येथे झालेल्या भगवद्गीता पठण कार्यक्रमाला मी उपस्थित राहिले नाही. कारण हा कार्यक्रम भाजपाशी संबंधित होता. जर हा कार्यक्रम निष्पक्ष असता तर मी नक्कीच गेले असते. मी एका राजकीय पक्षाशी संबंधित आहे आणि एका विचारसरणीचे पालन करते. मी प्रत्येक धर्माचा आणि प्रत्येक समुदायाचा आदर करते. पण ज्या कार्यक्रमात भाजपाचा थेट सहभाग आहे अशा कार्यक्रमात मी कशी सहभागी होऊ शकते? ममता बॅनर्जी पुढे म्हणाल्या की, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा अपमान करणाऱ्या किंवा महात्मा गांधींच्या तत्त्वांचा अनादर करणाऱ्या कार्यक्रमांना मी उपस्थित राहत नाही. माझ्या पालकांनी मला हे शिकवले नाही. मी बंगालचा अपमान करणाऱ्या आणि बंगालविरोधी लोकांसोबत नाही.

# भास्कर जाधव आणि प्रताप सरनाईक भेटीमुळे 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा

■ नागपूर

**नागपूरच्या** एका हॉटेलमध्ये ठाकरे गटातील ज्येष्ठ नेते भास्कर जाधव यांनी शिंदे गटाचे मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. हॉटेलच्या लॉबीत बोलत असतानाचा या दोघांचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने उद्धव ठाकरे यांच्यासोबतचे उरलेसुरले शिलेदार गळाला लावण्यासाठी 'ऑपरेशन टायगर' पुन्हा सुरू केल्याची चर्चा रंगली आहे.

भास्कर जाधव यांच्यासोबतची भेट झाल्यानंतर प्रताप सरनाईक म्हणाले की, नगरविकास राज्यमंत्री असताना मी भास्कर जाधव यांच्याकडे माझी कामे घेऊन जात होतो. आमदार हा मंत्र्यांकडे जात असतो. मंत्री कुठल्या पक्षाचा आहे, हे आमदार बघत नसतो. भास्कर जाधवांच्या विधानसभा मतदारसंघात एसटी बससंदर्भात काही अडचणी आहेत. त्यांच्या भागात एसटी बस सुरू करायची आहे. एसटी महामंडळांतर्गत त्यांना माझ्याकडून काही मदत हवी असेल तर मी मदत करीन. त्याचा ऑपरेशन टायगरशी संबंध नाही. ऑपरेशन टायगर हे सुरू आहे. मात्र, आमची भेट त्यासाठी नव्हती. ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे म्हणाले की, भास्कर जाधव हे पदासाठी इकडे तिकडे जाणारे नेते नाहीत.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# संरक्षण सिद्धतेच्या विस्तारणाऱ्या सीमा

देशाची संरक्षण व्यवस्था मजबूत असणे ही काळाची गरज आहे. आतापर्यंत भारताला आपल्या संरक्षण सिद्धतेसाठी जगातल्या इतर देशांवर अवलंबून राहावे लागत होते. स्वाभाविकपणे भारताच्या संरक्षण सिद्धतेवर होणारा खर्च हा परदेशातून संरक्षण सामुग्री आणण्यावर खर्च होत होता. कुठेतरी याच गरजेचा गैरफायदा अमेरिका, रशिया यासारखे देश घेत होते. कारण सगळ्यांची संरक्षण सिद्धता खूपच तगडी असल्याने भारताला त्यांच्याकडून शस्त्रखरेदीशिवाय पर्याय राहत नव्हता. भारताला सुरक्षित राहण्यासाठी शस्त्र हवी होती. तर या मोठ्या देशांना आपला शस्त्राचा बाजार नफ्यात चालावा म्हणून भारतासारख्या देशांची गरज होती. आज मात्र परिस्थिती पूर्ण बदललेली आहे. दहा वर्षांपूर्वी भारताला शस्त्रखरेदीसाठी दरवर्षी साधारणपणे दीड दोन लाख कोटी खर्च करावे लागत होते. आज परिस्थिती अशी झाली आहे की भारत स्वतःच वेगवेगळ्या प्रकारच्या संरक्षण साहित्याचे उत्पादन करतो आणि ही उलाढाल दीड लाख कोटींपर्यंत गेली आहे. अगदी अमेरिका, रशिया, चीन हेदेखील भारताकडून शस्त्रखरेदी करीत नसले तर जवळपास जगातले पस्तीस ते चाळीस देश भारताकडून शस्त्रखरेदी करीत आहेत. त्यासंबंधीचे करार भारताबरोबर करीत आहेत. मध्यम आकाराची जहाजे, पाणबुड्या, रणगाडे, या आणि अशा छोट्या मोठ्या संरक्षण साहित्याची निर्मिती करून भारताने आपला दबदबा निर्माण केलेला आहे. आधुनिक पद्धतीची तंत्रज्ञानावर आधारित शस्त्रनिर्मितीतही भारताने मोठी आघाडी घेतली असून, भारतीय संरक्षण विकास संशोधन संस्थेकडून म्हणजेच डीआर डीओकडून या नव्या शस्त्रनिर्मितीसाठी सातत्याने संशोधन सुरू असते. आधुनिक आणि अमेरिका, रशिया यासारख्या देशांनी विकसित केलेली विमाने भारत जाणीवपूर्वक खरेदी करतो. कारण अशा खरेदीतून नव्या तंत्रज्ञानाची माहिती तर होतेच. शिवाय तशा प्रकारचे संरक्षण साहित्य तयार करण्याच्या दिशेने भारतही पुढाकार घेत राहतो. म्हणूनच भारताची संरक्षण सिद्धता ही संशोधनाला वाव देणारी आणि जगात आपले स्थान अधिक भक्कम करणारी ठरते आहे.

**सीमावर्ती भागात मजबूत बांधकाम**

भारताच्या परावलंबित्वाचे परिणामही तितकेच धोकादायक ठरले होते. पकिस्तानच्या घुसखोरीपासून ते चीनने सीमेलगत केलेल्या बांधकामापर्यंत त्याची उदाहरणे पाहायला मिळतात. भारताकडे संरक्षण सिद्धताच नाही हे गृहित धरून चीन आक्रमकपणे सीमाभागामध्ये मोठमोठी बांधकामे करीत राहिला. परंतु भारताने संरक्षण सामुग्रीच्या उत्पादनाबरोबरच सीमावर्ती भागात पायाभूत सुविधांच्या उभारणीवरही जोर दिला. भारत-पाकिस्तान सीमा बंदिस्त करण्याला प्राधान्य दिलेच. शिवाय अशा प्रकारची सीमावर्ती भागात प्रकल्प राबवणाऱ्या बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनची स्थापना केली गेली. जिच्या माध्यमातून आज लडाख, जम्मू-काश्मीर, अरूणाचल प्रदेश, सिक्कीम, हिमाचल प्रदेश, राजस्थान, पश्चिम बंगाल आणि मिझोरम या सात राज्यांमध्ये जवळपास पाच हजार कोटी रुपये खर्चून विविध प्रकल्पांचे बांधकाम केले गेले. ज्यामध्ये २८ रस्ते आणि ९३ पुलांचा समावेश आहे. अशा प्रकारचे जवळपास साडेतीनशे प्रकल्प गेल्या दहा वर्षांत पूर्ण झालेले आहेत. म्हणजेच संरक्षण सिद्धता ही केवळ मनुष्यबळ आणि शस्त्रसामुग्रीतल्या संख्येवरून सिद्ध होत नाही तर देशाच्या सीमावर्ती भागात आक्रमकपणे केलेल्या संरक्षण विषयक उभारणीतूनसुद्धा त्याचे महत्त्व लक्षात येते. जी राष्ट्रे भारताच्या या परावलंबित्वाचा गैरफायदा घेत होती. त्यांना आता जगातल्या इतर देशांकडूनही भारताविषयीचे संदेश जाऊ लागले आहेत. शिवाय पाकिस्तान, चीन, बांगलादेश यासारख्या देशांना भारताच्या सीमा म्हणजे 'आओ जाओ घर तुम्हारा' असे वाटत होते. त्यांची आता चांगलीच नाकेबंदी होऊ लागलेली आहे. असे असूनही पाकिस्तानकडून दहशतवाद्यांच्या माध्यमातून घुसखोरी करण्याचा प्रयत्न होतो. आता पाकिस्तान हाच संरक्षण सिद्धतेबाबत सर्वात परावलंबी देश ठरत असल्याने भारताच्या या संरक्षण सिद्धतेपुढे तो स्वाभाविकपणे हतबलही होतो आहे. गेल्या वर्षभरात भारताने चीनप्रमाणेच आपल्या सीमावर्ती भागात केवळ रस्तेच नव्हे तर विमानतळासारखीदेखील बांधकामे केली आहेत. ज्याचा उपयोग प्रामख्याने लष्कराला होणार आहे. गढवाल खोऱ्यातल्या कुरापतीनंतर चीनही काही प्रमाणात शांत झाला आहे. कारण थेट प्रतिकाराबरोबरच सीमावर्ती भागातली ही बांधकामे चीनला परस्पर उत्तर देणारी ठरली आहेत.

**मुत्सद्देगिरीचा एक भाग**

संरक्षण सामुग्रीचे उत्पादन हे अंतर्गत आणि बाह्य सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे ठरते. कारण गेल्या दहा वर्षांत देशाच्या अनेक भागांत संरक्षण सामुग्री निर्माण करणाऱ्या कंपन्या आकाराला आल्या. त्यांनी दर्जेदार उत्पादने केली. जी अगदी आताच्या ऑपरेशन सिंदूरमध्येसुद्धा खूप सहाय्यभूत ठरली. अजूनही नवीन नवीन तंत्रज्ञानाशी संबंधित अनेक प्रकारची उत्पादने तयार होत आहेत. अगदी अंतराळ संशोधन त्यातून होणाऱ्या वेगवेगळ्या उपग्रहांचे प्रक्षेपण हे सुद्धा देशाच्या बाह्य आणि अंतर्गत सुरक्षिततेला सहाय्यभूत ठरलेले आहे. संरक्षण सिद्धता ही परराष्ट्रीय धोरणाच्या माध्यमातूनही राबवावी लागते. मुत्सद्देगिरी किंवा वेगवेगळ्या स्तरावर केल्या जाणाऱ्या चर्चा हा देशाच्या मुत्सद्देगिरीचाच एक भाग असतो. परंतु संरक्षण सामुग्री किंवा सीमावर्ती भागातली पायाभूत प्रकल्पांची उभारणी यातून दिला जाणारा संदेश हादेखील मुत्सद्देगिरीचा एक भाग ठरतो. चीन असे गृहित धरून चालत होता की, आपल्याइतकी पायाभूत सुविधांची निर्मिती सीमावर्ती भागात भारत करूच शकणार नाही. परंतु आज भारताने तोडीस तोड उत्तर मिळेल अशा पद्धतीने बरीच बांधकामे या भागामध्ये केलेली आहेत. गेल्या पाच वर्षांत ड्रोन तंत्रज्ञान इतके वेगाने विकसित झाले की, सीमावर्ती भागात टेहळणी करण्यापासून ते शस्त्र किंवा स्फोटके शत्रू राष्ट्रात आणून टाकण्यापर्यंत त्याचा उपयोग होऊ लागला. भारताने हा धोका ओळखला आणि तितक्याच वेगाने स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित ड्रोन्सचे उत्पादन सुरू झाले आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

शांत राहण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही, त्याबद्दल विचार करणे सोडून देणे हे केव्हाही चांगले.

## पंचांग

**मंगळवार, ९ डिसेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

**मार्गशीर्ष कृष्ण पंचमी**
**नक्षत्र : आश्लेषा**

**रवी उदय- ०७-०२**
**रवी अस्त- १८-००**



**-: जन्मराशी :-**
००-०१ ते २४-०० **कर्क**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




## आवळा लाँजी



★ **साहित्य :-** आवळा - ५०० ग्रॅम, तेल - २ टेबलस्पून, गूळ - ३०० ग्रॅम, बडीशेप - १ टेबलस्पून, जिरे - १ टीस्पून, तिखट - १ टीस्पून, मेथी- १ चमचा, हळद - अर्धा टीस्पून, काळी मिरी - अर्धा चमचा, चवीनुसार वेलची पावडर - अर्धा टीस्पून, हिंग चिमूटभर, १ वाटी पाणी.

★ **कृती :-** सर्वप्रथम आवळा धुवून कुकरमध्ये टाकून त्यात पाणी घालावे. गॅस चालू करून त्यावर कुकर ठेवावा. कुकरच्या १-२ शिट्ट्या घ्याव्यात. ते थंड झाल्यावर त्यांच्या बिया काढा आणि त्यांचे लहान तुकडे करा. नंतर कढईत २ टेबलस्पून तेल घालून गरम करा. गरम तेलात १ चमचा अख्खी बडीशेप आणि १ चमचा मेथीदाणे, १ चमचा जिरे घालून हलके तळून घ्या.

गॅस मंद करून त्यात १ चिमूट हिंग, चिरलेला आवळा, हळद, काळी मिरची पावडर, मीठ घाला. गूळही घाला. सर्वकाही चांगले मिसळा आणि गूळ वितळेपर्यंत शिजवा. अधूनमधून ढवळत असताना मंद आचेवर शिजवा. गूळ वितळला की थोडा घट्ट होईपर्यंत शिजवा. शिजल्यावर त्यात वेलची पावडर टाकून ढवळून घ्या. नंतर गॅस बंद करून थंड होऊ द्या. अशा प्रकारे आवळा लाँजी तयार आहे.



# आजपासून भारत-द.आफ्रिका टी-२० मालिका सुरू
## कटकचे बाराबती क्रिकेट स्टेडियम सामन्यासाठी सज्ज

**कसोटी मालिकेत मानहानीकारक पराभव आणि एकदिवसीय मालिका जिंकल्यानंतर भारतीय संघ आता दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. या मालिकेतील पहिला टी-२० सामना उद्या मंगळवारी कटकच्या बाराबती क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार आहे.**



■ कटक

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात दुखापतग्रस्त झालेला शुभमन गिल टी-२० मालिकेत परतला आहे. गिलच्या पुनरागमनामुळे यष्टीरक्षक-फलंदाज संजू सॅमसनच्या अडचणी वाढल्या आहेत. टी-२० उपकर्णधार गिल आता अभिषेक शर्मासोबत डावाची सुरुवात करेल, अशी अपेक्षा आहे. कर्णधार सूर्यकुमार यादव तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करेल. सूर्याचे फॉर्ममध्ये परतणे संघासाठी महत्त्वाचे आहे. तिलक वर्मा चौथ्या क्रमांकावर खेळणे जवळजवळ निश्चित आहे. संघ व्यवस्थापन यष्टीरक्षक म्हणून जितेश शर्मावर अवलंबून राहू शकते. संजू सॅमसनला मधल्या फळीत फारसे काही करता आलेले नाही. तो अजूनही सलामीवीर म्हणून संघात स्थान मिळविण्यासाठी संघर्ष करत आहे

अष्टपैलू हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे हे खालच्या फळीला बळकटी देऊ शकतात. शिवाय, गरज पडल्यास ते गोलंदाजी देखील करू शकतात. कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती फिरकी गोलंदाजीची जबाबदारी घेऊ शकतात. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात एकूण ३० सामने खेळले गेले आहेत. त्यापैकी भारताने १८ आणि दक्षिण आफ्रिकेने १२ सामने जिंकले. प्रथम फलंदाजी करताना भारताने १४ सामन्यांत विजय मिळवला, तर दक्षिण आफ्रिकेने ३ सामने जिंकले.

**भारतीय संघ**

**सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, हरदीप यादव, सुनील यादव.**

**दक्षिण आफ्रिका संघ**

**एडन मार्कराम (कर्णधार), डेवाल्ड ब्रेविस, टोनी डी झोर्झी, रीझा हेंड्रिक्स, डेव्हिड मिलर, जॉर्ज लिंडे, कॉर्बिन बॉश, मार्को जॅन्सन, क्विंटन डी कॉक (यष्टीरक्षक), डोनोव्हन फरेरा (यष्टीरक्षक), ट्रिस्टन स्टब्स, ओथनील बार्टमन, केशव महाराज, एन. क्यूएडी, केशव महाराज.**

## गिरगावात १० डिसेंबरला 'मुंबई श्री' स्पर्धा होणार

■ मुंबई

**शिवसेना** आणि युवक उत्कर्ष मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि हौशी शरीरसौष्ठव संघटना बृहन्मुंबई यांच्या मान्यतेने मुंबई जिल्हास्तरीय (मुंबई श्री २०२५) शरीरसौष्ठव स्पर्धा आयोजित केली जाणार आहे. १० डिसेंबरला दुपारी २ वाजल्यापासून होणारी ही स्पर्धा गिरगाव, केळेवाडीतील मराठी साहित्य संघ मंदिरात होणार आहे. ही स्पर्धा मुंबई उदय (२५ वर्षांखालील स्पर्धक, मुंबई श्रीमान (४० वर्षांवरील स्पर्धक) मुंबई बॉडी फिटनेस, मुंबई श्री २०२५ (खुली स्पर्धा) अशा चार प्रकारांत खेळवली जाणार आहे.

## बंगळुरूमध्ये १७ डिसेंबरपासून विश्व टेनिस लीगला सुरुवात

■ बंगळुरू

**बंगळुरूच्या** एस. एम. कृष्णा टेनिस स्टेडियमवर १७ ते २० डिसेंबर या कालावधीत विश्व टेनिस लीगच्या पहिल्या सत्राला सुरुवात होणार आहे. या लीगची तिकीट विक्री सुरू केलेली आहे. सर्व संघ एकमेकांशी दोन वेळा भिडणार आहे. या लीगच्या गुणतालिकेतील अव्वल दोन संघांना अंतिम फेरीत प्रवेश मिळणार आहे. या स्पर्धेची अंतिम फेरी २० डिसेंबरला होणार आहे. ही लीग टेनिसच्या चार प्रकारांत खेळवली जाणार आहे. पुरुष एकेरी, महिला एकेरी आणि दोन मिश्र प्रकारात फेऱ्या होणार आहे. या आवृत्तीत डॅनिल मेदवेदेव, निक किर्गिओस, एलेना रायबाकिना, पॉला बडोसा, रोहन बोपन्ना, गेल मोनफिल्स, आर्थर फिल्स, सुमित नागल, मॅग्डा लिनेट आणि मार्टा कोस्ट्युक यासारख्या टेनिस प्रतिभावंत खेळणार आहेत.

## सिंघानिया स्कूलच्या विजयात आर्य आणि कनिश चमकले



■ ठाणे

कनिश कदमने मिळवलेले तीन बळी आणि आर्य गजराच्या अर्धशतकी खेळीमुळे सुलोचनादेवी सिंघानिया स्कूलने अमुलख आमिचंद इंटरनॅशनल स्कूलचा १९३ धावांनी दणदणीत पराभव करत मुंबई शालेय क्रीडा संघटना आयोजित गाईल्स शिल्ड आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत स्थान मिळवले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना आर्य, अद्वैत कचराज आणि अन्वय शेळकेने संयमी फलंदाजी करत संघाला २१९ धावांचा पल्ला गाठून दिला. आर्यन ५६, अन्वयने ३८ आणि अद्वैतने ३४ धावा केल्या. पर्व चौहान आणि विहान मोपणीने प्रत्येकी चार फलंदाज बाद केले. उत्तरादाखल अमुलख आमिचंद इंटरनॅशनल स्कूलचा डाव फक्त ३६ धावांवर ढेपाळला. कनिशसह आदित्य गोखले आणि अनिश गोपाळेने प्रत्येकी दोन बळी मिळवत संघाच्या मोठ्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

संक्षिप्त धावफलक : सुलोचनादेवी सिंघानिया स्कूल : सर्वबाद २१९ (आर्य गजरा ५६, अन्वय शेळके ३८, अद्वैत कचराज ३४, पर्व चौहान ६-३८-४, विहान मोपाणी १०-१-३९-४) १९३ धावांनी विजयी विरुद्ध अमुलख आमिचंद इंटरनॅशनल स्कूल : सर्वबाद ३६ (कनिश कदम ०.४-०-३-३, आदित्य गोखले ३-१-१०-२, अनिश गोपाळे ४-०-२४-२).

## विश्वचषक! २५ मीटर पिस्तूल प्रकारात भारतीय नेमबाज सिमरनप्रीतला सुवर्ण

■ दोहा

दोहा येथे सुरू असलेल्या नेमबाजी विश्वचषकात भारतीय महिला नेमबाज सिमरनप्रीत कौर ब्रारने महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक जिंकले, तर ५० मीटर रायफल ३ पोझिशन पुरुष प्रकारात भारताच्या ऐश्वर्य प्रताप सिंग तोमरने विश्वचषकामध्ये पदार्पणातच रौप्यपदक जिंकले.

जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत २५ मीटर रॅपिड-फायर पिस्तूल रौप्यपदक विजेता अनिश भानवालानेही वर्षाचा शेवट उच्च कामगिरीने केला. तो दुसऱ्या स्थानावर राहिला. त्यामुळे भारताची पदकांची संख्या सहा झाली, ज्यामध्ये दोन सुवर्ण, तीन रौप्य आणि एक कांस्य पदकाचा समावेश आहे. दुसऱ्या दिवशीच्या दमदार कामगिरीसह भारताने पदक तालिकेत चीननंतर दुसरे स्थान कायम ठेवले, ज्याच्याकडे तीन सुवर्ण, दोन रौप्य आणि तीन कांस्यपदके आहेत. या वर्षाच्या सुरुवातीला लिमा येथे झालेल्या विश्वचषकात रौप्य पदक जिंकणारी सिमरनप्रीत, जिच्या वडिलांनी आपल्या मुलीसाठी सरकारी नोकरी सोडली होती. तिने अंतिम फेरीत शानदार ४१ गुणांची नोंद करून तिच्या कारकिर्दीतील सर्वात मोठी कामगिरी केली आणि तिच्या पालकांना अभिमान वाटला. तिने जागतिक ज्युनियर विक्रमाची बरोबरीही केली.

## शाकिबने निवृत्ती मागे घेतली

■ ढाका

**बांगलादेशचे** स्टार अष्टपैलू खेळाडू शाकिब अल हसन यांनी मोईन अलीच्या 'बियर्ड बिफोर विकेट' पॉडकास्टमध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, त्यांनी अद्याप तिन्ही फॉरमॅटमधून (टेस्ट,वनडे आणि टी-२० ) अधिकृतपणे निवृत्ती घेतलेली नाही. याबद्दल त्यांनी पहिल्यांदाच उघडपणे बोलले आहे.

शाकिब म्हणाले, मी अजून सर्व फॉरमॅटमधून निवृत्त झालेलो नाही. माझी योजना आहे की, बांगलादेशला परत जाऊन एक पूर्ण देशांतर्गत मालिका (टी-२०, वनडे आणि टेस्ट) खेळावी आणि त्यानंतर तिन्ही फॉरमॅटमधून एकाच वेळी निवृत्ती घ्यावी. मालिका टी-२० ने सुरू होवो किंवा टेस्टने, मला काही फरक पडत नाही.मला फक्त एक पूर्ण मालिका खेळून चाहत्यांचा निरोप घ्यायचा आहे.

## राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा धाराशिव आणि सांगलीने विजेतेपद पटकाविले

■ अहिल्यानगर



**५१ वी** कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचा रोमांचक समारोप झाला. मुलांच्या गटात धाराशिवने सलग दुसऱ्या वर्षी अजिंक्यपद पटकावत इतिहास रचला, तर मुलीच्या गटात सांगली संघाने अप्रतिम खेळ करत विजेतेपद नावावर केले. या स्पर्धेत धाराशिवचा जितेंद्र वसावे व सांगलीची सानिका चाफे यांनी अनुक्रमे विवेकानंद व सावित्री या सर्वोत्कृष्ट अष्टपैलू पुरस्कारांवर आपली मोहोर उमटविली.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने अक्षय शिवाजीराव कर्डिले युवा प्रतिष्ठान, विश्वंभरा प्रतिष्ठान व बाणेश्वर क्रीडा मंडळ बुऱ्हाणनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित केली होती. अहिल्यानगर येथील श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बुऱ्हाणनगर येथे झालेल्या या स्पर्धेत मुलींच्या उपांत्य फेरीत गतविजेत्या धाराशिवला पराभूत करणाऱ्या ठाणे जिल्ह्याचा आत्मविश्वास उंच होता. परंतु अंतिम सामन्यात सांगलीने अद्भूत प्रतिकार करत ३०-२८ ने विजय मिळवला. मध्यंतरास सांगलीकडे १६-१२ अशी आघाडी होती आणि ती त्यांनी अखेरपर्यंत सांभाळली. त्यांच्या सानिका चाफेने २.२७ व २.३० मिनिटे संरक्षण, ८ गुण अशी जबरदस्त अष्टपैलू कामगिरी केली.

# विदर्भ वेगळा करण्याची भाजपाची भूमिका कायम! बावनकुळे यांचे वक्तव्य

■ नागपूर

काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी वेगळ्या विदर्भाची मागणी केल्याबद्दल बोलताना भाजपाचे नेते मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वेगळ्या विदर्भाची मागणी भाजपा पहिल्यापासून करत आला आहे.काँग्रेसला आता वेगळ्या विदर्भाची कल्पना सुचली आहे,असे विधान केले. बावनकुळे म्हणाले की, वेगळ्या विदर्भाबाबत आमची भूमिका कायम आहे. मुख्यमंत्री आणि भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी आजवरची भूमिका ही वेगळ्या विदर्भाबाबतच मांडलेली आहे. वेगळ्या विदर्भाचा मुद्दा कांग्रेस पक्ष आता काढत आहे, मात्र हा मुद्दा आमचा आहे. भाजपच्या अजेंडाचा मुद्दा आहे. भाजपच्या अजेंडातून हा मुद्दा बाहेर गेलेला नाही. यासंदर्भात वडेट्टीवार म्हणाले होते की, वेगळा विदर्भ झाल्याशिवाय विदर्भाचा विकासाचा अनुशेष भरुन काढणे शक्य नाही. त्यामुळे भविष्यात वेगळा विदर्भ झालाच पाहिजे. वेगळा विदर्भ आम्हाला हवा आहे कारण आताच्या सामाजिक समीकरणानुसार विदर्भात ओबीसी, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याकांचं प्राबल्य राहिले आहे. विदर्भात मिश्र समाज आहे. या समाजांच्या दृष्टीकोनातून आपण पाहिले तर या लोकांना सत्तेत फार कमी संधी मिळाली आहे. जोपर्यंत सत्तेत सहभागी होत नाही, तोपर्यंत त्या भागाला न्याय दिला जाऊ शकत नाही. त्यामुळे भविष्यात वेगळा विदर्भ झाला पाहिजे.

# प्रदूषणकारी शासकीय बांधकामांवर महापालिका कठोर कारवाई करणार

■ मुंबई

प्रदूषण नियंत्रण मार्गदर्शन तत्त्वाचे उल्लंघन केल्याने पालिकेकडून नोटीस बजावल्यानंतरही प्रदूषण करणाऱ्या शासकीय बांधकामांवर यापुढे कठोर कारवाई करण्यात येणार आहे. प्रसंगी काम बंद करण्याचे आदेशही देण्यात येईल, असे महापालिका अतिरिक्त आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे यांनी येथे स्पष्ट केले.

प्रदूषणाच्या वाढत्या समस्येवर हरित पर्याय म्हणून शहरात 'बांबू' रोपणाचा उपक्रम महापालिका हाती घेईल, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. प्रदूषणाचा परिणाम मुंबईतील आर्थिक गुंतवणुकीवर होऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ढाकणे म्हणाले की, खाजगी बांधकामाप्रमाणे शासकीय प्रकल्पातही मोठ्या प्रमाणात मार्गदर्शन



तत्त्वांचे उल्लंघन करून प्रदूषण वाढवले जात असल्याच्या तक्रारी पालिकेकडे आल्या आहेत. नोटिशीनंतरही संबंधित प्रकल्पांकडून मार्गदर्शक तत्त्वांची पायमल्ली केली जाते. अशा बांधकामांवर मोठ्यात मोठा दंड लावून कारवाई केली जाणार आहे. प्रसंगी काम बंद करण्याच्या सूचनाही देण्यात येणार आहेत. सध्या पालिकेकडून १० हजार रुपये प्राथमिक दंड लावला जातो. प्रभाग कार्यालयाकडून संबंधित बांधकामांची लवकर माहिती मिळाल्यास कारवाई करणे शक्य होईल. त्यासाठी बैठक घेतली जाईल. पालिकेकडून गेल्या आठवड्यापर्यंत १७१ खाजगी बांधकामे आणि ७ पालिका बांधकामांना कारणे दाखवा नोटीस तर ७८ बांधकामांना कामे थांबवा नोटीस बजावण्यात आली आहे. नेव्ही नगर येथील वाढत्या प्रदूषणाबाबत आयआयटीची मदत घेतली जाणार आहे.

# ७५ हजार कोटी पेक्षा जास्त रकमेच्या पुरवणी मागण्या सादर

» पान १ वरून

विभाग ४८५३ कोटी सार्वजनिक आरोग्य ३५७१ कोटी वैद्यकीय सिक्षण ५९५ कोटी आदिवासी विकास १२५३कोटी सहकार पण न ५१५कोटी महिला बालविकास विभागाच्या ५०२४कोटी पाणि पुरवठ्या १९६ कोटी इमाव १७०३कोटी नगरविकास २६३६कोटी सार्वजनिक बांधकाम रस्ते विकास ५८९३ कोटी जलसंपदा ३२०६कोटी रूपयांची तरतूद केली आहे,

# राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नोवेल साळवेंचे उपोषण

■ मुंबई

नोवेल यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यातील आरोपी अजून मोकाट असून त्याला तत्काळ अटक करण्यात यावी तसेच गुन्हेगारांना पाठीशी घालणार्या पोलीस अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी आझाद मैदानात उपोषण सुरू केले. हल्लेखोरांना अटक होत नाही उल्हासनगर सेंट्रल पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आवताडे यांना पोलीस खात्यातून बरखास्त केले जात नाही तोपर्यंत मी माझे धरणे आंदोलन सोडणार नाही, अशी भूमिका नोवेल साळवे यांनी घेतली आहे.

# नीलगाईच्या हल्ल्यात वृद्ध महिलेचा मृत्यू

■ शहापूर

किन्हवली परिसरातील गुंड्याचापाडा (चिखलगाव) येथे नीलगाईच्या धडकेत ६५ वर्षांच्या निर्मलाबाई गजानन वेखंडे या महिलेचा दुर्देवी मृत्यू झाला.मयत निर्मलाबाई या आपल्या नातू भावेश प्रकाश वेखंडे याच्यासोबत शेतावरून घरी परतत असताना अचानक नीलगाईने दोघांच्या अंगावर उडी मारत जोरदार धडक दिली. या धडकेत त्या गंभीर जखमी झाल्या तर भावेशच्या पायाला फ्रॅक्चर झाले. निर्मलाबाई यांना तत्काळ मुंबई येथे उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान शनिवारी त्यांचा मृत्यू झाला.

किन्हवली परिसरात निलगाईंचा वाढता उपद्रव शेतकऱ्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. नीलगाईच्या कळपांमुळे खरीप आणि रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान होत असून शेतकरी भयभीत झाले आहेत. गावाशेजारीच नीलगाईंचे वास्तव्य वाढल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहापूरचे भाजप पूर्व मंडळ अध्यक्ष सुभाष हरड यांनी वनविभागाने तातडीने नीलगाईंचा बंदोबस्त करावा, मृत महिलेच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that my client, SHREE S.S. INFRA DEVELOPERS PRIVATE LTD; a Private Limited Company, represented through its Director SHRI VAIBHAV ATMARAM KOKATE, having registered office at 102, S.H.H. Residency, Near Shiva Industrial Estate, Near Tata Power Co., Lake Road, Bhandup (West), Mumbai- 400 078 have vide three separate registered development Agreements acquired Development rights from its respective Owners in respect of under mentioned Property of Village Kanjur (west), Taluka Kurla, District Mumbai Sub-urban within the local limit of "S" Ward of Brihan Mumbai Municipal Corporation. The proportionate rights of the owners are as follows;

1a) Mr. Binny John, 1b) Mr. Freny John, 1c) Mr. Jerome Angel, 1d) Mr. James Angel, 1e) Mr. Joseph Angel, 1f) Mrs. Janet Marydas, 1g) Mrs. Jasmine Thomas (all legal heirs of late V.L. Angel holding 40% rights) AND

2a) Mr. Sarain Zacharia, 2b) Mrs. Maryn Daniel, 2c) Mr. Lerin Zacharia (all legal heirs of late V.L. Zacharia, holding 20% rights) AND

3a) Mrs. Roise Victor, 3b) Mr. Christy Fernandes, 3c) Mrs. Floris Jacob, 3d) Mrs. Shiny Verghese, 3e) Mr. Biju Verghese, 3f) Mrs. Merlin Fransis, 3g) Mrs. Everlin Jose, 3h) Mr. Hallis Francis Fernandes, 3i) Mrs. Grace Pascal Valooran, 3j) Mrs. Rosia Jacob (all legal heirs of late V. L. Fransis, holding 40% rights). All three branches above having joint rights in the property admeasuring total area of **1455.69** sq. mtrs. or thereabouts bearing C.T.S. Nos. 448, 448/1 to 448/21 AND

4) Angel Co-operative Housing Society Ltd., having rights on property admeasuring an area of **1217.31** sq. mtrs. or thereabouts bearing C.T.S. Nos. 448.

My clients have instructed me to investigate title and issue title clearance certificate in respect of the said property more particularly described in the Schedule hereunder written. Any person/s having any right or claim upon the said property or any part thereof by way of sale, mortgage, lease, gift deed, inheritance, court decree or in any other manner are required to make the same known in writing along with supporting documentary evidence to the undersigned at his office at Akanksha, 2nd Floor, Sane Guruji Nagar, Mulund (East), Mumbai – 400 081, within fourteen days from the date hereof, failing which it will be presumed that there are no such claims and if any, the same are waived or abandoned and title of my client to the said property shall be certified by me as clear and marketable.

**Dated 09th December 2025**
**(SAMIR K. VAIDYA)**
**Advocate**

# वंदे मातरमचे कौतुक करतानाही मोदींचा नेहरूंवरच वार

» पान १ वरून

तमाम भारतीयांच्या नसानसांमध्ये भिनलेले संस्कार, परंपरा आणि संस्कृती यांना उत्तम शब्दात बांधून उत्तम भाव-भावनांमध्ये गुंफलेली मौल्यवान देणगी आहे. ज्या प्रमाणे एखाद्या नदीचा प्रवाह तिच्या संपूर्ण वाटचालीत भिन्न संस्कृतींशी जोडलेला असतो त्याच प्रमाणे वंदे मातरम या गीतामध्ये भारतीय संस्कृती आणि राष्ट्रप्रेम ओतप्रोत भरलेले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या ७२ वर्षे आधी जर बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांना स्वतंत्र भारताचे स्वप्न पाहिले तर आम्ही सुध्दा या काळात वंदे मातरमची कास धरून पुढील पंचवीस वर्षांत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे स्वप्न निश्चित पाहू शकतो.

यानंतर पुन्हा काँग्रेसवर टीका करीत मोदी म्हणाले की वंदे मातरमच्या दिडशे वर्षांच्या वाटचालीत काही निराशाजनक टप्पेही आले होते. वंदे मातरमला जेव्हा पन्नास वर्षे पूर्ण झाली तेव्हा देश इंग्रजांच्या गुलामगिरीमध्ये होता. या गीताला जेव्हा शंभर वर्षे पूर्ण झाली तेव्हा आपल्याच सत्ताधाऱ्यांनी देशावर आणीबाणी लादून देशाच्या संविधानाची हत्या केली. देशासाठी तो एक काळाकुट्ट कालखंड होता. देशभक्तीवर बोलणाऱ्यांना गजाआड केले जात होते. संपूर्ण देश आणीबाणीच्या साखळदंडांमध्ये जडखला गेला होता. त्या काळ्या कालखंडातून बाहेर पडण्याची प्रेरणा वंदे मातरम या गीताने दिली. वंदे मातरमशी जोडलेली ही काळी कुट्ट पार्श्वभूमी आजच्या युवकांना माहिती व्हावी म्हणून त्याचे स्मरण करून द्यावे लागत आहे. गेल्या शतकात वंदे एवढे आघात का झाले, वंदे मातरमचा विश्वासघात का केला गेला, ती कोणती शक्ती होती की जी महात्मा गांधी यांच्या भावनेवर भारी पडली. याची जाणीव आजच्या पिढीला करून देणे आमचे कर्तव्य ठरते.

वंदे मातरमवरील पंतप्रधानांच्या टीकेला काँग्रेसच्या नेत्या खासदार प्रियंका गांधी यांनी आपल्या भाषणात जोरदार प्रत्युत्तर दिले. त्या म्हणाल्या की, राष्ट्रीय गीत म्हणून वंदे मातरम या पूर्ण गीतामधील पहिली दोन कडवी घेण्याचा ठराव ज्या अधिवेशनात मंजूर झाला त्या अधिवेशनात गुरु रवींद्र नाथ टागोर, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि तत्कालीन जनसंघाचे नेते डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी आदि थोर राष्ट्रपुरुष हजर होते. त्यांच्यापैकी एकानेही या प्रस्तावाला विरोध केला नाही. वंदे मातरमचे तुकडे एका विशिष्ट समुदायाच्या तुष्टीकरणासाठी काँग्रेसने केले असे म्हणून मोदींना त्या सर्व राष्ट्रपुरुषांचा अपमान केला आहे.

आपल्या भाषणातून प्रियंका गांधी यांनी मोदी आणि तमाम भाजपावाल्यांना उद्देशून एक आव्हान दिले. त्या म्हणाल्या की, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर जेवढे आरोप करायचे असतील, त्यांनी केलेल्या जेवढ्या चुका दाखवायच्या असतील त्याची एक यादी तयार करा. संसदेत जशी वंदे मातरमवर दहा तास चर्चा घेतली तशीच दहा,वीस, तीस किंवा चाळीस तास त्या यादीवर चर्चा घ्या. मात्र त्यानंतर नेहरू हा विषय कायमचा बंद करा. त्यानंतर या सदनात चर्चा बेरोजगारी, पेपरफुटी, महागाई, महिलांवरील अत्याचार आदि सर्वसामान्य जनतेला छळणाऱ्या मुद्यांवर होऊ द्या. जनतेने ज्या कारणांसाठी आपल्या सर्वांना या सदनात निवडून पाठवले त्या विषयांवर चर्चा करू.जनतेच्या कामासाठी असलेला वेळ नेहरूनंतर आरोप आणि टीका करण्यात वाया घालवू नका.

त्यांच्या या वक्तव्यावर सत्ताधाऱ्यांनी गदारोळ केला. या गदारोळात प्रियंका गांधी यांनी म्हटले की स्वातंत्र्याला ७५ वर्षे उलटून गेल्यावर आता वंदे मातरमवर चर्चा करण्याची मुळीच आवश्यकता नाही. देशवासियांचा आत्मा असलेल्या वंदे मातरमवर चर्चा करणे हे सरकारचे पाप आहे. काँग्रेस या पापात सामील होणार नाही. बेरोजगारी आणि महागाई यांसारख्या विषयांवरून देशवासीयांचे लक्ष अन्यत्र वळवण्यासाठी चर्चेचा घाट घातला गेला आहे, असे खडसावून सांगितल

महाराष्ट्रात विधिमंडळ अधिवेशन सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संसदेतील वंदे मातरमवरील चर्चेबद्दल बोलताना सांगितले की, आज आम्ही विधिमंडळात संपूर्ण वंदे मातरम गाऊन या गीताला नमन केले. वंदे मातरम हा स्वातंत्र्याचा मंत्र आहे. भाजपाच्या काळात वंदे मातरमचा नेहमीच आदर, सन्मान करण्यात आला.सर्वसामान्यांना स्वातंत्र्याच्या लढयाशी जोडणारा हा मंत्र आहे. विधिमंडळाच्या पुढील अधिवेशनात आम्ही वंदे मातरमवर चर्चा घेऊ.

**SEALED TENDERS INVITED FOR THE REPAIR AND PAINTING WORK OF**

**VISHRAM TOWER No.1 CHS LTD,** SECTOR NO. 9, SHREE NAGAR, WAGLE ESTATE,THANE (W) - 400604. Tender forms available Consultant's office at Office No 425, Gundecha Industrial Complex, Prem. Co. Op. Soc. Ltd., Near Growel's Mall, Akurli Road, Kandivali (East), Mumbai-400101 from Date: 09/12/2025 to 17/12/2025 between 12 PM to 5 PM (Except Sunday) Last Date of submission sealed tender 22/12/2025 between 12 pm to 5 pm Tender to be submitted at society's office cost of tender RS 4000/- in cash (Nonrefundable) **Standard Civil Engineers PVT LTD Mob: 9819037336 / 022-44503050**

**मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड**

**निविदा करिता विनंती - MRVC/G/106/R**

(दोन पाकिट ई- प्रोक्योरमेंट निविदा प्रक्रिया)

मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लि. ज्यांचे कॉर्पोरेट कार्यालय दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन इमारत, मुंबई-400020 येथे आहे, यांचे द्वारे **"विरार - डहाणू आणि पनवेल - कर्जत प्रकल्पात आवश्यक असलेल्या संपूर्ण टी अँड पी उपकरणांसह वीज पुरवठा उपकरणांच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी मोबाईल इन्स्टुमेंटेशन व्हॅनची खरेदी"** ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदाचे तपशील आणि निविदा दस्तावेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **https://www.eprocure.gov.in/eprocure/app** वर उपलब्ध आहेत। पूर्ण भरलेली ई-निविदा वेबसाईट **https://www.eprocure.gov.in/eprocure/app** वर जमा करण्याची शेवटची तारीख 13.01.2026 रोजी दु. 15.00 वा. पर्यंत आहे. **शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वैबसाईट वर प्रसिद्ध करण्यात येईल।**

**जाहीर सूचना**

आम्ही पुर्वांकरा लिमिटेड. सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्रशासनाच्या पर्यावरण विभागाने सीटीएस क्र. १/१७, १/२४, १/२९, ओशिवरा गांव, तालुका. अंधेरी, जिल्हा.मुंबई, महाराष्ट्र येथिल आम्ही प्रस्तावित केलेल्या पुनर्विकास प्रकल्पाला दिनांक ०३ डिसेंबर २०२५ रोजी पत्र क्रमांक EC24C3801MH5962009N. अन्वये पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून मान्यता दिली आहे. सदरमान्यता पत्राची प्र त महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्याकार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या http://parivesh.nic.in/ संकेतस्थळावरउपलब्ध आहे.

**पुर्वांकरा लिमिटेड.**

**PUBLIC NOTICE**

NOTICE IS HEREBY GIVEN THAT 1) Dr. Amit V. Karkhanis & 2) Dr. Anagha A. Karkhanis who are the joint owners of 25% Undivided share, rights, title and interest in the land or ground admeasuring 666.97 sq.mtrs. or thereabouts, in Plot bearing No. 77-C, on TPS-IV, S.V Road, Santacruz (West), Mumbai 400054 bearing C.S.No H/310 Bandra Division in the registration district and Sub-District of Bombay City and Bombay ("The said Land") more particularly described in the schedule I herein since March, 2011.

Further, 1) Dr. Amit V. Karkhanis & 2) Dr. Anagha A. Karkhanis who are the joint owners of office at 2nd floor admeasuring 2000 sq.ft. or thereabouts presently known as Apsara House along with Two car parking space nos. 3 & 4 constructed on Plot bearing No. 77-C, on TPS-IV, S.V Road, Santacruz (West), Mumbai 400 054 bearing C.S. No H/310 Bandra Division in the registration district and Sub-District of Bombay City and Bombay suburban ("The said Office") more particularly described in the schedule II herein since March, 2011.

My Clients are in the process to execute and register a Deed of Assignment or such other relevant deeds with respect to undivided shares, rights, title and interest of the said Land as well the said Office from 1) Dr. Amit V. Karkhanis & 2) Dr. Anagha A. Karkhanis.

All persons having or claiming to have any share, rights, title or interest to or in the said Land as well as on the said Office or any part or portion thereof of any nature or any claim by way of, under or in the nature of any agreement, license, sale, mortgage, lien, charge, outgoings, gift, lease, sub-lease, under-lease, exchange, tenancy, possession, easement, right, covenant or condition, maintenance, encumbrance or otherwise howsoever or any part thereof are hereby required to make the same known in writing along with the supporting documents to the undersigned within 15 (Fifteen) days from the date of publication of this notice. Any claim not so made in writing as hereby required shall be deemed as waived or abandoned and not binding on the undersigned and the undersigned will complete the proposed transaction.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO**

**SCHEDULE- I**

25% Undivided share, rights, title and interest in the land or ground admeasuring 666.97 sq.mtrs. approx. being Plot bearing No. 77-C, on TPS-IV, S.V Road, Santacruz (West), Mumbai 400 054 bearing C.S. No H/310 Bandra Division in the registration district and Sub-District of Bombay City and Bombay suburban

**SCHEDULE- II**

2nd floor office premise admeasuring 2000 Sq. Ft Area presently known as Apsara House alongwith Two car parking space nos. 3 & 4 constructed on Plot bearing No. 77-C, on TPS-IV, S.V Road, Santacruz (West), Mumbai 400 054 bearing C.S. No H/310 Bandra Division in the registration district and Sub-District of Bombay City and Bombay suburban

Dated this 09th day of December, 2025

**JAY K VAKIL**
**(Advocate For the Proposed Transferees)**
903, 9th Floor, Rasik C.H.S.L, Plot No.114, Tilak Road No.6, Goregaon-(W), Mumbai-400 104
adv.jayvakil@gmail.com

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given to the Public at Large that I, GORAKH GOVIND MEGH, I.A.S. (Retired), aged about 77 years, state & confirms that I am not in contact in any manner whatsoever with my Step Sister Mrs. Gunami Sipka for over a period of last 2 years including her Family Members namely - her mother, sisters, brother and other relatives.

I further state and confirm that I alongwith my wife Dr. Mandakini Megh have not visited my Native Place in Khairar and other places in Orissa for over 6 years till date.

I am suffering from various Medical Ailments due to my Age and for such I am living my life peacefully alongwith my lawfully wedded wife Dr. Mandakini Megh at below mentioned address in Mumbai and for such want to give this Public Notice to inform People at Large of such facts as stated hereinabove.

**MR. GORAKH MEGH,**
R/o. A-502, "A" wing, 5th Floor, Amaltas Bldg., Juhu Versova Link Road, Andheri (w), Mumbai – 400 053, (M) 9821624808.

**PUBLIC NOTICE**

**NOTICE** is hereby given to the Public at Large that I, **DR. MANDAKINI GORAKH MEGH**, aged about 74 years, W/o. **Mr. Gorakh Govind Megh,** states & confirms that I am not in contact in any manner whatsoever, with any of my Husbands Relatives in India, Abroad and at his **Native Place in Khairar** & other places in Orissa.

I am suffering from various **Medical Ailments** due to my Age and for such I am living my life peacefully alongwith my lawfully wedded husband **Mr. Gorakh Govind Megh** at below mentioned address at **Mumbai** and for such want to give this Public Notice to inform People at Large of such facts as stated hereinabove.

**DR. MANDAKINI MEGH**
R/o. A-502, "A" wing, 5th Floor, Amaltas Bldg., Juhu Versova Link Road, Andheri (w), Mumbai – 400 053,
(M) 9821624808.

**जाहीर सूचना**

येथे सर्वसामान्य जनतेस सूचना देण्यात येते की, आम्ही, आमच्या अशिलांच्या वतीने, **मे. भारत विजय कॉर्पोरेशन**, एक रीतसर समाविष्ट भागीदारी फर्म, त्याचे भागीदार **श्री. प्रकाश राधाकिशीन मनवानी आणि श्रीमती पुष्पा राधाकिशीन मनवानी (मालक)** यांच्यामार्फत, त्या प्रिमायसेसवरील हक्क, शिर्षक आणि हितसंबंधांची चौकशी करत आहोत, जे येथे दिलेल्या **अनुसूची**मध्ये **(सदर प्रिमायसेस)** अधिक स्पष्टपणे वर्णन केले आहे.

कोणत्याही बँकेच्या किंवा वित्तीय संस्थेसह कोणत्याही संस्थेला/व्यक्तीला, ज्यांच्याकडे सदर जागेच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, करार, कंत्राट, गहाणखत, सुविधा, भेटवस्तू, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, वहिवाट, उप-वहिवाट, परवाना, धारणाधिकार, शुल्क, ट्रस्ट किंवा किंवा कोणत्याही ट्रस्ट अंतर्गत फायदेशीर हक्क/हितसंबंध, प्रिस्क्रिप्शनचा अधिकार किंवा पूर्व-निश्चिती किंवा कोणत्याही तरतुदी किंवा इतर व्यवस्था किंवा निवासस्थानाचा अधिकार, व्यवसाय, ताबा, कुटुंब व्यवस्था, तडजोड, देखभाल, असाइनमेंट, कोणत्याही न्यायालयाचा डिक्री किंवा आदेश, भागीदारी, कोणताही लेखन आणि/किंवा व्यवस्था किंवा अन्यथा काहीही असो याद्वारे कोणताही अधिकार, शिर्षक, लाभ, हित, दावा किंवा मागणी आहे आणि/किंवा सदर जागेच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात विकास अधिकार असल्यास त्यांनी खालील स्वाक्षरीकर्त्याला सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरूपात आणि ईमेलद्वारे, येथे नमूद केलेल्या पत्त्यावर १४ (चौदा) दिवसांच्या आत ईमेलद्वारे सूचित करणे आवश्यक आहे, अन्यथा, असा हक्क, शिर्षक, हितसंबंध, लाभ, दावा, मागणी, आणि/किंवा आक्षेप, जर काही असेल तर, माफ केलेला आणि/किंवा सोडून दिलेला मानला जाईल.

**सदर प्रिमायसेसची अनुसूची**

मरिन चेंबर्स प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड यांनी २७ मार्च १९८७ रोजी जारी केलेल्या भाग प्रमाणपत्र क्र. ६० अंतर्गत, रु. ५०/- मूल्याच्या प्रत्येकी अशा ५ (पाच) पूर्णतः भरलेल्या शेअर्स, ज्यांचे विशिष्ट क्र. २९६ ते ३०० (दोन्ही समाविष्ट) आहेत, तसेच त्यासोबत कार्यालय क्र. ५११ वापरण्याचा व ताब्यात घेण्याचा मालकी हक्क, ज्याचे क्षेत्रफळ सुमारे ३२१ चौ. फूट (बिल्ट अप क्षेत्र), ५वा मजला, 'मरीन चेंबर्स' नावाच्या इमारतीत, जी ४३, न्यू मरीन लाइन्स, मुंबई–४०० ०२० येथे स्थित आहे, आणि जी मरीन लाईन्स इस्टेट, सर्व्हे क्र. ८४५३ (भाग), कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. १४१८, फोर्ट विभाग यांच्या प्लॉट क्र. ११ वर उभी आहे, नोंदणी जिल्हा मुंबई यांच्या मर्यादेत.

**आज दिनांकित ९ डिसेंबर २०२५**
सही/-
**नीरव सी. जानी**, भागीदार
**जानी आणि पारिख**करिता
वकिल आणि सॉलिसिटर
३११, दलामल टॉवर्स,
२११, फ्री प्रेस जर्नल रोड, नरिमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१.
ईमेल: nirav@janiparikh.in

**जाहीर सूचना**

तमाम सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, ९३, सौरभ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., प्रार्थना समाज रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथे राहणारे माझे अशील मुंबईचे **श्री. जयेश छानुभाई प्रजापती**, वय अदमासे ६३ वर्षे, भारतीय निवासी यांच्याकडून त्यांचे खालील **मूळ दस्तऐवज** हरवले आणि गहाळ झाले आहेत:

१. प्लॉट क्र. ६५, टीपीएस II, प्रार्थना समाज रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथे स्थित पार्ले स्काय-व्ह्यू को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. या संस्थेमधील तळमजल्यावरील दुकान क्र. ५, मोजमाप ६५ चौ.फू. बिल्ट-अप क्षेत्रफळ शी संबंधित बिल्डर/विकासक, एका भागाचे पक्षकार म्हणून; आणि श्री. नारायणभाई परमार, त्यामधील **"खरेदीदार/वाटप प्राप्तकर्ता"** दुसऱ्या भागाचे पक्षकार म्हणून, यांच्या द्वारे आणि दरम्यान बॉम्बे/मुंबई येथे बनलेले समान दिनांकाचे करारपत्र/वाटप पत्र.

उपरोल्लेखित गहाळ दस्तऐवजाच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, ताबा, वारसा, धारणाधिकार, वहिवाट, मृत्युपत्र या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असणाऱ्या, तसा दावा असणाऱ्या कोणीही/ सर्व व्यक्ती आणि/ किंवा वित्तीय संस्था यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, दाव्याच्या पृष्ठ्यर्थ सर्व कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह **वकील, श्री. दिपेश जे. सांचला** यांना कार्यालय क्र. ए-०२, तळमजला, आलोक अपार्टमेन्ट सीएचएसएल, महंत रोड विस्तारित, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथील कार्यालयात या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये कळवावे, अन्यथा असे सर्व दावे, हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध जर असल्यास, पुढील कोणत्याही सूचनेशिवाय सोडून दिले आणि/ किंवा गुंडाळून ठेवले असे समजण्यात येईल.

दिनांकः ०९.१२.२०२५

**(श्री. दिपेश जे. सांचला)**
**वकील**

**TENDER NOTICE**

Sealed item rate tenders are invited from qualified & reputed contractors who have executed similar work to quote for Repairs, Waterproofing, Plumbing, Painting & Plastering work on behalf of:

**GOREGAON TEEN DONGRI SHRAMASAFALYA CO-OP. HSG. SOCIETY LTD.**

**Building No. E-1, Teen Dongri, Yashwant Nagar, Goregaon West, Mumbai - 400 104.**

Tender Forms can be collected from Consultant's Office from **09/12/2025** to **17/12/2025** between **10.30 am** to **5.00 pm.** (Except Holiday)

**Submission Date: 20.12.2025**

**STERLING CONSORTIUM**
**An ISO 9001:2015 CERTIFIED CO.**

**Add: Shop No. 21, Shree Ganesh Ekta Building, Reddy Bldg. No. 2, Near Ganesh Mandir, Yashwant Nagar, Goregaon (W), Mumbai – 400 104. Tel: 83558 68566**

**Tender Cost: Rs. 5,000/- in cash (Non Refundable).**

**PUBLIC NOTICE**

NOTICE IS HEREBY GIVEN to the Public at large that **SMT. ZAIBUNNISA NAEEM ROKADIA** is the owner of the building bearing C S No. 33 of Mandvi division more particularly described in the schedule hereunder written.

The Original Deed made by and between Mr. Mahomedbhai Soeb Khambati & Ors, the Vendors & Smt. Zaibunnisa N Rokadia, the Purchaser duly registered under Serial no. BBE1/09717/2006 dt 28/09/2006 hereinbefore mentioned is lost and/or misplaced and is not traceable by the Owner.

We have to issue clear and marketable title free from all encumbrances, claims, demands, and reasonable doubts of any nature whatsoever in respect of the said Building.

Any person either having or claiming any right, title, interest, claim in and/or in possession of the said Building or any part thereof and any claim on in any manner including by way of any arrangement, sale, transfer, exchange, conveyance, assignment, charge, mortgage gift, trust, lease, monthly tenancy, leave license partnership joint ventures, inheritance, lien, easement right to prescription, an adverse right, title, interest or claim of any nature whatsoever, dispute, suit, decree, order, award, restrictive covenants, order or injunction, attachment, acquisition, Requisition or otherwise is hereby called upon and required to make the same known in writing with genuine notarized documents along with original documents within 07 days from the date of publication hereof to the undersigned at their office, address, failing which any such claim, if any, shall be deemed to be waived and/or abandoned and we would issue clear and marketable title for the said Building.

**Schedule of the said Property**

All that the plot of land situated at the corner of Janjikar Street and Sarang Street, Mumbai 400 003 within the limits of Greater Mumbai in the district and registration sub-district of Mumbai City registered by the collector of land revenue under Old No. 29, New Nos.208 and 209, Old Survey No 1076, New Survey Nos. 1996 and 1997 L. T. A. C. R. R. No.1130 and Cadastral Survey No. 33 of Mandvi Division admeasuring about 59.36 sq. mts (hereinafter referred to as the Plot) with the building assessed to municipal taxes under "B" Ward Nos. 129, 130 Street Nos 70-76, Sarang Street (hereinafter referred to as the Building) standing thereon, the said Plot with the said Building shall hereinafter collectively be referred to as the Property.

**MUMBAI, DATED 9th day of December 2025**

**H.A.LAKDAWALA**
**Advocate High Court**
Ashoka Shopping Centre, O.No.219, 2nd floor, L.T. Marg, Crawford Market, Mumbai-400001

**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**सुचना-एसआरएम-८०**

खालील निविदा https://eprocurement.mahagenco.in वर प्रकाशित केल्या आहेत

| अ. क्र. | ई-निविदा क्र. | विषय | इसारा रक्कम/ अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ६६०मेगावॅट/सीएचपी/ टी-५३४/आरएफएक्स -३००००६३८४२ | सीएचपी-३x६६० मेगावॅट, केटीपीएस, कोराडी येथे वॅगन टिपलर १ आणि २ साठी जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा स्टोन ग्रॅपलर मशीनच्या ऑपरेशन व देखभालीचे सर्वसमावेशक काम. | रू. ३१,४७९.२६ / रू. २,७९७,९२५.७६ |
| २ | ६६०मेगावॅट/सीएचपी/ टी-५३५/आरएफएक्स -३००००६३४४६ | केटीपीएस कोराडी येथील सीएचपी ३x६६० मेगावॅटमधील बीसीएन-७ए आणि ७बी येथे बेल्ट कन्वेयर सिस्टीमसाठी स्पिलेज-फ्री मशीनीकृत स्वच्छता प्रणालीच्या डिझाईन, निर्मिती, पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वयनाचे काम. | रू. १९९,५००.०० / रू. १९,६००,०००.०० |
| ३ | ६६०मेगावॅट/सीएचपी/ टी-५३६/आरएफएक्स -३००००६३८४७ | सीएचपी-व्हीएम ३x६६० मेगावॅट, केटीपीएस कोराडी येथे जशी व जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा ऑटोमोटिव्ह बॅटरींची खरेदी. | रू. ६,८३६.०० / रू. ३३३,५३६.५५ |
| ४ | ६६०मेगावॅट/सीएचपी/ टी-५३७/आरएफएक्स -३००००६३८३३ | सीएचपी ३x६६० मेगावॅट, केटीपीएस कोराडी येथे रूफ एग्झॉस्ट फॅनचे सुटे भाग व इतर संबंधित ऍक्सेसरीजची खरेदी. | रू. ७,३९१.३६ / रू. ३८९,१३५.५७ |

ई-टेंडरिंगसाठी बोलिदात्यांना त्यांच्या फर्मची नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
अधिक माहितीसाठी संपर्क: कार्यकारी अभियंता (खरेदी), केटीपीएस, कोराडी, नागपूर.
मोबाईल क्र.: **+९१-८४११९५८६२२**
ई-मेल आयडी : eepurchasekoradi@mahagenco.in

**हस्ता/-**
**मुख्य अभियंता,(सं. व सु.)**
**महानिर्मिती, केटीपीएस, कोराडी**

**फॉर्म ए**
**जाहीर घोषणा**
*(इन्सॉल्व्हन्सी अँण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन ६ अन्वये)*

**गुजरात पोसित्रा स्टिल कंपनी लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | **गुजरात पोसित्रा स्टिल कंपनी लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना तारीख | २५.०४.२००५ |
| ३ | ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४ | कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र. /मर्यादित दायित्व ओळख क्र. | U27100MH2005PLC152813 |
| ५ | कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता | **नोंद.पत्ता-** १३/१९८, जे. टाटा रोड, खेतान भवन, चर्चगेट मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००२०. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | ०४.१२.२०२५ (आदेश मिळाल्याची तारीख ०६.१२.२०२५) |
| ७. | दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख | ०२.०६.२०२६ (आदेश दिनांकापासून १८० दिवस ०४.१२.२०२५) |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोर व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | एनपीव्ही इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची मंत्राह इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात) त्यांचे संचालक - श्री.मोहित बिपीनचंद्र अदातिया यांच्यामार्फत आयबीबीआय नोंद क्र.: IBBI/IPE-0040/IPA-2/2022-23/50021 |
| ९. | बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ता: एच-३५, पहिला मजला जंगपुरा एक्सटेंशन, जंगपुरा, दक्षिण दिल्ली, नवी दिल्ली - ११००१४. ईमेल आयडी: ipe@npvca.in |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल | **पत्रव्यवहाराचा पत्ता:** १० वा मजला, १००३, झीओन झेड१, अवलॉन हॉटेलजवळ, सिंधू भवन रोड, थालतेज, अहमदाबाद - ३८००५४ प्रक्रिया ईमेल आयडी: cirp.gpscl@npvinsolvency.in |
| ११. | दावा सादर करण्याची अंतिम तारीख | २०.१२.२०२५ (०६.१२.२०२५ चा आदेश मिळाल्यापासून १४ दिवस) |
| १२. | कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, जर असेल तर, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोंचे वर्ग | लागू नाही |
| १३. | वर्गातील कर्जदारांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखल्या गेलेल्या दिवाळखोर व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत: | (अ) www.ibbi.gov.in cirp.gpscl@npvinsolvency.in (ब) लागू नाही |

येथे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ VI ने दि.०४.१२.२०२५ (आदेश प्राप्त दिनांक ०६.१२.२०२५) रोजी गुजरात पोसित्रा स्टिल कंपनी लिमिटेडच्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेची सुरुवात करण्याचे आदेश दिले आहेत.

गुजरात पोसित्रा स्टिल कंपनी लिमिटेडच्या धनकोंना, दि. २०.१२.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी त्यांचे दावे पुराव्यांसह नोंद क्र.१० विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर अंतरिम निराकरण व्यावसायिकाकडे सादर करण्याचे आवाहन केले जाते.

वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच सादर करावेत. इतर सर्व धनको पुराव्यासह वैयक्तिकरित्या, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दावे सादर करू शकतात.

पुष्टी क्र.१२ मध्ये सूचीबद्ध केल्याप्रमाणे वर्गातील वित्तीय धनको कर्जदार, फॉर्म सीए - एनए मध्ये वर्गाचा अधिकृत प्रतिनिधी (वर्ग निर्दिष्ट करा) म्हणून काम करण्यासाठी पुष्टी क्र.१३ विरुद्ध सूचीबद्ध केलेल्या तीन दिवाळखोर व्यावसायिकांपैकी अधिकृत प्रतिनिधीची निवड सूचित करेल.

दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

**आयपीई- एनपीव्ही इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड**
**(पूर्वीची मंत्राह इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात)**
**त्यांचे संचालक - श्री. मोहित बिपीनचंद्र अदातिया यांच्यामार्फत**
**अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल म्हणून नियुक्ती**
**गुजरात पोसित्रा स्टिल कंपनी लिमिटेडच्या बाबतीत**
**आयबीबीआय नोंदणी क्र.:** IBBI/IPE-0040/IPA-2/2022-23/50021
**एएफए वैधता:** ३१ डिसेंबर २०२५
पत्रव्यवहारासाठी ईमेल - cirp.gpscl@npvinsolvency.in

**दिनांक: ०९ डिसेंबर २०२५**
**ठिकाण: अहमदाबाद**

# अनन्याची ग्लोबल भरारी

बॉलीवूडची आघाडीची नायिका अनन्या पांडे हिची जागतिक पातळीवरील उपस्थिती सातत्याने विस्तारत असून आता तिने आपल्या ब्रँड प्रवासात आणखी एक महत्त्वाची पायरी गाठली आहे. अमेरिकन 'एगल' या लोकप्रिय जागतिक डेनिम आणि लाइफस्टाईल ब्रँडने तिला अधिकृतपणे 'ग्लोबल अ‍ॅम्बेसेडर' म्हणून घोषित केले आहे. 'शॅनेल' या लक्झरी फॅशन हाऊसच्या मोहिमेनंतर मिळालेला हा नवा करार तिच्या वाढत्या प्राधान्य देणारी शैली तिला विविध क्षेत्रातील ब्रँडसाठी आकर्षणाचे केंद्र बनवत आहे. लक्झरी असो, ब्युटी असो, लाईफस्टाईल असो किंवा आता जागतिक स्तरावरील डेनिम बाजार अनन्याने स्वत:ला एक विश्वासार्ह आणि बहुगुणी ब्रँड-फेस म्हणून सिद्ध केले आहे.

प्रत्येक नव्या भागीदारीसह ती हे दाखवते की तिचा प्रभाव फक्त सिनेमातील लोकप्रियतेपुरता मर्यादित प्रभावाचे आणि नव्या पिढीशी तिच्या असलेल्या संवादक्षमतेचे मोठे प्रतीक मानले जात आहे.

'जेन झेड'च्या सहज ऊर्जेचे प्रतिनिधित्व करणारी अनन्या पांडे ही विविध ब्रँडसाठी नैसर्गिक निवड ठरत आली आहे. जगभरातील तरुण ग्राहकांना थेट संबोधित करण्यासाठी जे ब्रँड नवीन चेहऱ्यांच्या शोधात असतात, त्यांना अनन्याची शैली, साधेपणा आणि आधुनिक दृष्टिकोन तितकाच आकर्षक वाटत आहे. आपला अनुभव सांगताना अनन्या म्हणाली, या ग्लोबल कॅम्पेनचा भाग होणे म्हणजे जणू माझ्या ऑफस्क्रीन आयुष्यातली पर्वणीच आहे.


अनन्याची मोहकता आणि कम्फर्टनेसला नाही. एकामागोमाग एक जागतिक करार मिळवत चालल्याने अनन्या पांडेची भरारी आता जागतिक ब्रँडस्पेसमध्येही वेगाने सुरू असल्याचे दिसते.



# पुन:प्रक्षेपणाचे 'शोले'

गेल्या पन्नास वर्षांपासून भारतीय प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान मिळवलेला 'शोले' हा चित्रपट येत्या १२ डिसेंबरला पुन्हा प्रदर्शित होत आहे. 'शोले-द फायनल कट' या नावाने नव्या आवृत्तीचे प्रमोशन सुरू असून, यामध्ये चित्रपटाचा मूळ शेवट पुन्हा दाखवला जाणार आहे. विशेष म्हणजे हा शेवट गेल्या अर्धशतकात कधीच थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला नाहीये. तथापि, या पुन:प्रदर्शनापेक्षा जास्त चर्चेत आलेली गोष्ट म्हणजे लोकप्रिय ठरलेल्या संवादांमध्ये केलेला बदल आणि त्यावरुन उसळलेला नाराजीचा सूर.


मूळ बसंती (हेमा मालिनी), वीरू (धर्मेंद्र) आणि–जय (अमिताभ बच्चन) या त्रिकोणात चित्रपटात एक विनोदी संवाद आहे. यामध्ये बसंती वीरूला चिडवत म्हणते, बडे निशानेबाज लगते तुम,' त्यावर जय हसत म्हणतो, 'हां, जेम्स बाँड के पोते हैं ये.' या ओळी आजही जशाच्या तशा प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. मात्र नव्या ट्रेलरमध्ये जयची ही ओळ बदलली आहे. त्यात अमिताभ बच्चनचा आवाज असून तो म्हणतो की, तात्या टोपे के पोते हैं ये!' हा बदल कोणाच्या परवानगीने करण्यात आला, याचे उत्तर कोणाकडेही नाही. धक्कादायक बाब म्हणजे, खुद्द दिग्दर्शक रमेश सिप्पी यांनाही याची कल्पनाच नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या नव्या संवादबदलाबाबत चित्रपटाचे सहलेखक जावेद अख्तर यांनी अतिशय तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, बदललेल्या संवादाविषयी मी ऐकत आहे; पण यावर माझा विश्वासच बसत नाहीये. जेम्स बाँडऐवजी तात्या टोपे? याचा अर्थ काय? हा फक्त एक संवाद नाही; असे अनेक लोकप्रिय संवाद बदलले असण्याची शक्यता आहे. माझ्या मते, प्रेक्षक हे कदापि मान्य करणार नाहीत. मुळात, हा बदल कोणाच्या संमतीने केला? दिग्दर्शकांशी याबाबत बोलणी झाली आहेत का? असा सवाल त्यांनी विचारला आहे. अख्तर पुढे म्हणाले, मी किंवा सलीम साहेब यापैकी कुणाशीही चर्चा झालेली नाही. शोलेचे संवाद आजही लोकांना तोंडपाठ आहेत. इतकेच नव्हे, त्या काळी संवादांची लोकप्रियता पाहून पॉलीडोर या कंपनीने चित्रपटातील फक्त संवादांची खास कॅसेट रिलीज केली होती. विशेष म्हणजे त्या संवादाच्या कॅसेटने गाण्यांच्या कॅसेटपेक्षा जास्त विक्री केली होती. अशा सांस्कृतिक वारसाशी छेडछाड करणे योग्य नाही. तुम्ही हे बदलू शकत नाही, असे जावेद अख्तर म्हणाले.



त्यांच्या या प्रतिक्रियेमुळे नव्या आवृत्तीची उत्सुकता आणि वाद दोन्हीची तीव्रता सध्या शिगेला पोहोचली आहे. प्रेक्षकांच्या मनात 'शोले'चे स्थान इतके दृढ आहे की, किंचितसा बदलही तितकाच मोठा वाद निर्माण करून जाणार आहे. अख्तर यांची प्रतिक्रिया त्या भावनांचेच प्रतिनिधित्व करते.

# 'तारक मेहता...' बंद होणार?

'तारक मेहता का उल्टा चश्मा' हा गेली १८ वर्षे सुरू असलेला विनोदी सिटकॉम भारतीय घराघरांत लोकप्रिय झाला आहे. गोकुळधाम सोसायटीतील व्यक्तिरेखांभोवती फिरणारा हा कार्यक्रम लाखो प्रेक्षकांना भावला




आहे आणि त्यातील कलाकारांबद्दल प्रेक्षकांमध्ये वेगळीच आपुलकी निर्माण झाली आहे. २००८ मध्ये सुरुवात झालेली ही मालिका भारतीय टेलिव्हिजनवरील सर्वाधिक पसंती मिळवलेल्या सिटकॉमपैकी एक मानली जाते. अनेक प्रेक्षकांनी या मालिकेमध्येच बालकलाकारांना वाढताना पाहिले आहे. गेल्या काही वर्षांत या मालिकेभोवती अनेक वाद उद्भवले, काही कलाकारांनी निर्मात्यांवर गंभीर आरोप केले, तर काहींनी मालिकेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. या पार्श्वभूमीवर अलीकडेच ही मालिका बंद होत असल्याची बातमी समोर आल्याने प्रेक्षकांमध्ये मोठी खळबळ उडाली.

मालिकेचे दिग्दर्शक आणि निर्माता असित कुमार मोदी यांनी ही चर्चा पूर्णपणे खोटी असल्याचे स्पष्ट केले आहे. 'इंडियन टेलिव्हिजन अकादमी'च्या २५ व्या वर्षपूर्ती कार्यक्रमात सहभागी होताना असित मोदी यांनी सध्या तरी मालिका बंद करण्याचा कोणताही विचार नाही, असे सांगत सर्व अफवांना पूर्णविराम दिला आहे. या सर्व गदारोळात मालिकेतील अभिनेत्री प्राजक्ता शिसोदे यांनी मात्र या कार्यक्रमाला निरोप दिला आहे. गोकुळधाम सोसायटीमध्ये भाजी विक्रेत्या सुनीता म्हणून प्रेक्षकांना परिचित असलेल्या प्राजक्ताने सोशल मीडियावर पोस्ट करत हा निर्णय जाहीर केला. आपल्या पोस्टमध्ये तिने स्पष्टपणे नमूद केले की, ज्या लोकांना आपल्या भावनांची कदर नसते किंवा ज्यांच्याकडून आत्मसन्मानाला धक्का बसतो, अशांसोबत काम करू नये. 'सुनीता' ही भूमिका मिळाल्याबद्दल तिने निर्मात्यांचे आभार मानले आणि महिला मंडळातील सहकलाकारांना मिस करणार असल्याचे लिहिले. तिचे शोमधून बाहेर पडणे मालिकेसाठी आणखी एक धक्का मानला जात आहे. कलाकार बदलत राहिल्याने कथानकाची गती काही काळ मंदावते, वातावरणात संभ्रम निर्माण होतो, पण तरीही या मालिकेने वर्षानुवर्षे टिकवलेली लोकप्रियता आणि घराघरांत मिळवलेला स्नेह यामुळे प्रेक्षकांची नाळ अजूनही या कार्यक्रमाशी तशीच जोडलेली आहे.

# आठवण... ५० जणांकडून मार खाल्ल्याची!



'फूल और कांटे' फेम बॉलिवूड अभिनेता अजय देवगन आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात काहीशा राउडी स्वभावासाठी प्रसिद्ध होता. तरुणपणात त्याची अनेक वेळा भांडणे व्हायची. काही वेळा तर या भांडणांमध्ये त्याला मारही खावा लागला होता. काही वेळा परिस्थिती एवढी बिघडली की गँगवॉरची वेळ येऊन ठेपली. अलीकडेच दिलेल्या एका मुलाखतीतून अजयने आपल्या या अनुभवांविषयीचा उलगडा केला आहे.

मुंबईच्या रस्त्यावर कधीकाळी त्याची अक्षरश: दैना उडाली होती. एक-दोन नव्हे तर तब्बल ५० जणांनी अजयला घेरून मारहाण केली होती, असे त्याने या मुलाखतीत सांगितले.

ही घटना अधिक विस्ताराने सांगताना अजय म्हणाला की, त्या दिवशी त्याचा काही मुलांशी वाद झाला होता. सुरुवातीला चार-पाच जणांशी खटके उडाले आणि अजय त्यांना प्रत्युत्तर देऊ लागला. पण हळूहळू त्या जागी मोठा जमाव जमा झाला आणि पाहता पाहता ५० जणांनी त्याला घेरले. मी आधी त्यांना मारत होतो; पण नंतर मला मार बसू लागला. पूर्ण चेहरा सुजला, जबडा फुगला, शर्ट फाटला. कसेबसे सुटून मी त्या ठिकाणाहून बाहेर पडलो आणि जीव मुठीत धरून घरी पोहोचलो, असे अजय म्हणाला.

यानंतर अजयने आपल्या मित्रांना गोळा केले आणि पुन्हा त्याच ठिकाणी परत जाऊन पूर्ण शक्तीनिशी समोरच्यांना चोख प्रत्युत्तर दिले. अजयचे वडील विरू देवगन हे ख्यातनाम अ‍ॅक्शन डायरेक्टर होते. तो स्वत:ही स्टंट्स करणारा कलाकार म्हणून ओळखला जातो. बालपणापासूनच अजयचा लढवय्या राहिल्याचे अनेक प्रसंगी दिसून आले आहे.

अजय आणि सलमान खान यांची मैत्रीही बॉलिवूडमध्ये परिचित आहे. अनेकदा पडद्याबाहेरही दोघांची जुगलबंदी दिसली असून, त्यांच्या मैत्रीबद्दल सिनेवर्तुळात आदराने बोलले जाते.

## इंडिगोचा गोंधळात गोंधळ विमानात कबुतर शिरले

■ बडोदा


इंडिगो एअरलाईन्सचा गोंधळ सुरूच असताना बडोद्यात इंडिगोच्या एका विमानात कबुतर शिरले. त्यामुळे प्रवासी गोंधळून गेले. काही प्रवासी कबुतराला पकडण्याचा प्रयत्न करत होते. तर काही प्रवासी त्याला दरवाजाबाहेर घालवण्याचा प्रयत्न करत होते. कबुतर विमानाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत घिरट्या घालत होते. कर्ण पारेख या प्रवाशाने याचे चित्रीकरण करून हा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर पोस्ट केला.

## सोलर कनेक्शन सक्तीविरोधात कोल्हापुरात शेतकऱ्यांचे आंदोलन

■ कोल्हापूर

**कोल्हापूरमध्ये** सहकारी पाणीपुरवठा संस्थांच्या ट्रान्स्फॉर्मर, विद्युत पंप, वायर आणि इतर साहित्याच्या सुरू असलेल्या चोरीच्या घटनांचा निषेध म्हणून तसेच सोलर कनेक्शनची सक्ती रद्द करण्याच्या मागणीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी जोरदार आंदोलन केले. माजी आमदार आणि भाजपा नेते संजय घाटगे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. आंदोलनात शेतकऱ्यांसह विविध सहकारी पाणीपुरवठा संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलनकर्ते म्हणाले की, सहकारी पाणीपुरवठा संस्थांचे ट्रान्स्फॉर्मर हे संस्थांच्या मालकीचे असल्याने देखभाल आणि दुरुस्तीसाठी प्रचंड खर्च करावा लागतो, जो परवडणारा नाही. कॉपर



आणि ऑईल काढण्यासाठी ट्रान्स्फॉर्मर फोडून चोरी करण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रशासनाने यावर तातडीने कारवाई करावी. सोलर कनेक्शनची सक्ती केल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील हजारो अर्ज प्रलंबित आहेत.त्यामुळे सोलर कनेक्शनवरील सक्ती मागे घ्यावी अशी आमची मागणी आहे.

संजय घाटगे म्हणाले की, केवळ कोल्हापूर जिल्ह्यातच १५ ते १६ ट्रान्स्फॉर्मर चोरीला गेले आहेत. ट्रान्स्फॉर्मरचे पार्ट काढून नेण्याचे सत्र सातत्याने सुरू आहे. आमच्या अन्नपूर्णा पाणीपुरवठा योजनेतील ट्रान्स्फॉर्मरचा पार्ट चोरीला गेला होता. आम्ही नऊ लाख रुपये खर्च करून तो बसवला, परंतु पुन्हा दहा दिवसांत तोच पार्ट पुन्हा चोरीला गेला. चोरी करणाऱ्यांना तातडीने पकडा आणि शेतकऱ्यांच्या मालमत्तेवरील चोरीला आळा घाला.

## उरणच्या भेंडखळमध्ये भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू! ग्रामस्थांचा रास्ता रोको

■ उरण

**उरण** तालुक्यातील भेंडखळ गावाजवळ आज दुपारी घडलेल्या भीषण अपघातात भेंडखळ येथील अमोल काळूराम ठाकूर (३८) यांचा जागीच मृत्यू झाला. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास बामर रॅली कंपनीसमोरील रस्त्यावरून जात असताना ट्रेलरने दिलेल्या जोरदार धडकेमुळे ही दुर्घटना घडली. धडक बसताच अमोल ठाकूर यांचा जागीच मृत्यू झाला, तर ट्रेलर चालक वाहन घेऊन पसार झाला.



अपघातानंतर काही क्षणातच ग्रामस्थ घटनास्थळी मोठ्या संख्येने जमले. मृतदेह रस्त्यावरच असताना तीन ते चार तास उलटूनही प्रशासनाकडून कोणताही ठोस निर्णय न घेतल्याने ग्रामस्थांचा संताप वाढला. मयताच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई मिळेपर्यंत मृतदेह हलविणार नाही, असा ठाम इशारा ग्रामस्थांनी दिला. परिणामी रस्त्यावर ठिय्या देत रास्ता रोको करण्यात आला. परिस्थिती तणावपूर्ण होत असल्याचे लक्षात घेता महाविकास आघाडीचे नेते मनोहर भोईर, भावना घाणेकर तसेच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू केले. संतप्त नागरिकांशी चर्चा करून या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी नेत्यांनी पुढाकार घेतला.

## एमपीएससीची परीक्षा मतमोजणीमुळे पुढे ढकलली

■ नागपूर

**नगरपालिका** आणि नगर पंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबरला होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) महाराष्ट्र गट ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा २१ डिसेंबरला होणार की नाही असा विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. मात्र एमपीएससीच्या अंतिम पत्रानुसार, ही परीक्षा आता पुढे ढकलून ४ जानेवारी २०२६ रोजी घेण्यात येणार आहे.

दरवर्षी एमपीएससी मार्फत पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय), राज्य कर निरीक्षक (एसटीआय) आणि सहायक कक्ष अधिकारी (एएसओ) यांच्या पदांसाठी संयुक्त पूर्वपरीक्षा घेतली जाते. यंदा एकूण ६७४ पदांसाठी जाहिरात देण्यात आली आहे, त्यामध्ये सहायक कक्ष अधिकारी ३, राज्य कर निरीक्षक २७९ आणि पोलीस उपनिरीक्षक ३९२ पदांचा समावेश आहे. सुरुवातीला ही परीक्षा ९ नोव्हेंबरला होणार होती, पण राज्यातील पूर परिस्थितीमुळे ती पुढे ढकलण्यात आली होती.

## धनंजय मुंडे-फडणवीस भेट! बचावासाठी धडपड?

■ नागपूर

**अजित** पवार गटाचे आमदार व माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्री कार्यालयात भेट घेतली. या भेटीवेळी उपमुख्यमंत्री अजित पवार व राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्लाही उपस्थित होते. यामुळे खळबळ माजली. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे आणि त्यांची खास माणसे यांच्यावर आरोप होत असताना त्यातून सुटकेचा मार्ग शोधण्यासाठी ही बैठक झाली अशी चर्चा आहे.



या भेटीनंतर धनंजय मुंडे म्हणाले की, मी माझ्या मतदारसंघातील कामांसाठी मुख्यमंत्र्यांना भेटलो. मी १ लाख ४० हजार मतांनी निवडून आलो आहे. माझ्यावर काही जबाबदारी आहेच, त्यासाठी बीडच्या संदर्भातील कामांसाठी मी मुख्यमंत्र्यांना पत्र दिले आहे. आता आशा आहे की, ही कामे लवकर पार पडतील.

यावेळी मनोज जरांगे यांनी केलेल्या आरोपांविषयी विचारले असता धनंजय मुंडे यांनी बोलण्यास नकार दिला. ते म्हणाले की, मी मनोज जरांगे यांच्या आरोपांवर बोलणार नाही. या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. मागील एका वर्षापासून मला टार्गेट केले जात आहे.

## ५० हजार शिक्षक १० डिसेंबरला नागपूरला अधिवेशनात धडकणार

■ नागपूर

**राज्यातील** शिक्षक आपल्या विविध मागण्यांसाठी १० डिसेंबरला नागपूर अधिवेशनात धडकणार आहेत. ५ डिसेंबरला झालेल्या एक दिवसाच्या शाळा बंद आंदोलनानंतर आता ५० हजार शिक्षक नागपूरमध्ये एकवटणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या पटसंख्येनुसार लावलेल्या शिक्षकांच्या संचमान्यता निकषांवर राज्यातील असंख्य शाळा बंद होऊन शिक्षक सरप्लस होणार आहेत आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहेत. या पार्श्वभूमीवर विविध शिक्षक संघटना एकवटल्या आहेत. शिक्षक मागण्या मान्य करण्यासाठी नागपुरात ठिय्या देऊन शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधणार आहेत. १५ मार्च २०२४ रोजीच्या जीआरनुसार आदिवासी भागातील पटसंख्या २० पेक्षा कमी असलेल्या शाळा बंद होणार असल्याने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतील. त्यामुळे हा जीआर रद्द करून जुनी संचमान्यता धोरण लागू करण्याची शिक्षकांची मागणी आहे. ५३ वर्षांखालील शिक्षकांना टीईटी अनिवार्य केल्याने अनेक वर्ष अध्यापन करणाऱ्या शिक्षकांवर अन्याय होत असल्याने ही सक्ती रद्द करण्याची मागणीही त्यांच्याकडून केली जात आहे.



## सरकार-एअरलाइन्सचे संगनमत पृथ्वीराज चव्हाण यांचा हल्लाबोल

■ मुंबई

**इंडिगो** विमानसेवेत मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या गोंधळामुळे प्रवाशांना झालेल्या प्रचंड त्रासाबाबत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आज पत्रकार परिषदेत सरकारवर हल्लाबोल केला. इंडिगोचा गोंधळ हा वाढती मक्तेदारी, नियमांचे उल्लंघन आणि सरकार व एअरलाईन्स यांच्यातील संगनमत यामुळे निर्माण झाल्याचा ठपका चव्हाण यांनी ठेवला.केंद्रीय विमान वाहतूक मंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

कुलाबा गांधी भवन येथे पत्रकार परिषद ते बोलत होते. डीजीसीएने १ जुलै २०२४ पासून नियम लागू करण्यास सांगितले होते. मात्र नियमांची अंमलबजावणी न झाल्याने मक्तेदारी वाढत गेली. केवळ दोनच कंपन्यांची मक्तेदारी राहिली आहे. इंडिगो ६५ टक्के आणि टाटा समूह ३० टक्के ही स्थिती अत्यंत धोकादायक आहे. आयोगाला अशा मक्तेदारीला रोखण्यात पूर्ण अपयश आले असून, हा आयोग बरखास्त करून नवी समिती स्थापन करण्याची मागणी त्यांनी केली. इंडिगोने भाजपाला इलेक्ट्रो बॉण्डद्वारे ५६ कोटी रुपयांची देणगी दिली. त्याचा या निर्णयांशी काही संबंध आहे का? हे तपासणे गरजेचे आहे असेही ते म्हणाले.

प्रवाशांनी दुप्पट-तिप्पट किमतीत तिकीट घेतल्याने झालेल्या नुकसानीबद्दल सरकारने किमान १ हजार कोटींचा विशेष फंड तयार करावा,भोपाळ गॅस दुर्घटनेप्रमाणे भरपाई द्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## उरणमध्ये मनसे पदाधिकाऱ्यावर हल्ला भाजपाच्या १० समर्थकांवर गुन्हा दाखल

■ उरण

**उरणमध्ये** नगरपरिषद निवडणुकीदरम्यान भाजपाविरोधात प्रचार केल्याचा बदला म्हणून भाजपा समर्थकांनी मनसे पदाधिकारी सतीश बिपीन पाटील आणि त्यांच्या आईवर हल्ला केला. या प्रकरणी भाजपाच्या १० समर्थकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनसे वाहतूक सेनेचे राज्य उपाध्यक्ष पाटील यांच्या तक्रारीनुसार, दत्तजयंतीच्या दिवशी त्यांना रस्त्यात अडवून शिवीगाळ, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिली. आईला देखील धक्का दिला आणि आरोपींनी त्यांना जबरदस्तीने आमदारांच्या बंगल्यासमोर नेऊन माफी मागण्यास भाग पाडले आणि संपूर्ण घटनेचे व्हिडिओ शूट केले. या घटनेवर प्रतिक्रिया देताना महाविकास आघाडीच्या नेत्या भावना घाणेकर यांनी या प्रकाराला दहशतवादी राजकारण मानून जनतेने योग्य उत्तर देण्याची अपेक्षा व्यक्त केली. तर महाविकास आघाडीचे नेते मनोहरशेठ भोईर यांनी असा सूड उगवणे उरणच्या संस्कृतीस अपमानास्पद असल्याचे सांगितले आणि कृत्याचा निषेध व्यक्त केला.


## नालासोपाऱ्यात बेपत्ता मुलाचा मृतदेह पाण्याच्या टाकीत आढळला

■ वसई

**नालासोपाऱ्यातून** बेपत्ता असलेल्या ८ वर्षीय चिमुकल्या मुलाचा मृतदेह सोमवारी सकाळी इमारतीच्या खाली असलेल्या पाण्याच्या टाकीत आढळला. मागील ५ दिवसांपासून तो बेपत्ता होता. टाकीचे झाकण उघडे असल्याने पाय घसरून तो पाण्याच्या टाकीत पडल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

मेहराज शेख (८) हा मुलगा नालासोपारा पश्चिमेच्या टाकीपाडा येथील करारीबाग इमारतीत आई-वडिलांसह राहत होता. बुधवार ३ डिसेंबर रोजी दुपारी एक वाजता खेळायला बाहेर गेला होता. मात्र संध्याकाळी घरी परतला नव्हता. सर्वत्र शोध घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी ४ डिसेंबर रोजी त्याच्या पालकांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात मेहराज बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती.

# नवाकाळ शब्दकोडे-१४५५



**आडवे शब्द –**

१. विशाल, भव्य २. पलंगपोस ४. सदस्य ७. अंधार ९. विंचरलेल्या केसांचे दोन भाग करणे १०. कंटाळवाणी गोष्ट ११. साप, सर्प १२. घाबरून गप्प बसलेला १४. कोल्हा १६. कंबरडे १८. मालकाच्या वतीने दुष्कृत्ये करणारा २०. डोंगरउतार २१. पाषाण, फत्तर २२. सत्याचा आधार नसलेले, काल्पनिक २३. उथळ, पोरकट २४. दुधारी तलवार २५. तळतळाट २७. बेरकी, धूर्त २९. लाकूड खाणारा कीटक ३१. मुद्रणालय ३५. संगोपन करणारा ३६. तोंडाने वाजवण्याचे वाद्य, माउथ ऑर्गन ३७. ओळ, आवली ३९. मोकळी जागा, शेतात बांधलेली झोपडी ४०. तांबडे पंख असलेला लठ्ठ पोपट ४३. अर्भकाचे केस ४५. उत्तम स्वयंपाक करणारी ४६. गीत ४७. दिवंगत ४८. पूर्वज ५०. नाव ५१. लिहिण्याचे साधन ५२. औषधालय ५४. धनलाभ झालेला ५५. मदिरा, वारुणी ५६. स्त्रियांचा कंबरेचा दागिना ५७. दुर्बिणीची, चष्म्याची काच ५८. जिनसांची यादी ५९. काचेची बाटली ६०. सोशिक ६२. सागर, समुद्र ६३. विष्णूचा एक अवतार ६५. तळहाताचा प्रहार, चपराक ६७. लहर, लाट ६९. विवाह ७१. मसालेदार पातळ भाजी ७२. कपबशा व प्लेट्समधील मुख्य घटक ७४. शिवलिंग ७५. ईश्वराची साधना करणारा ७७. संवत्सर, वर्ष ७८. पराकाष्ठा ७९. शुक्लपक्षानंतरचा पंधरवडा ८०. मोड, अंकुर ८१. पुन्हा, पुनश्च ८२. समुदाय ८३. मीपणा, गर्व ८४. पायरी ८६. उत्साहभंग, हिरमोड ८८. शत्रू ९०. जिम्मेदारी ९३. आईची बहीण ९५. खाऊन संपवणे ९८. शिक्षा करणे, धडा शिकवणे ९९. वेळकाढूपणा

**उभे शब्द –** १. आटोकाट प्रयत्न करणे २. सुंदर ३. पोह्यांचा एक प्रकार ४. स्वाक्षरी ५. सर्वजण, सगळे ६. मोठ्या दरवाज्यातील लहान दरवाजा ७. वस्त्र ८. पूर्ण अभाव १०. शपथ ११. तर्क, कयास १३. मग्न, तल्लीन १५. तळ, खालचा भाग १७. आदला दिवस १८. शक्तिहीन १९. कल्हई करताना वापरला जाणारा धातू २१. स्थिती, अवस्था २६. शेंडी २८. प्रामाणिक, शब्दाचा पक्का ३०. पराक्रमी स्त्री ३२. पोबारा, पलायन ३३. विष्णूची पत्नी, लक्ष्मी ३४. तलवार ठेवण्याची जागा ३५. मोदक किंवा करंजीचे आवरण ३६. लहान मूल ३८. पदार्थ झणझणीत होण्यासाठी यांचा वापर करतात ३९. वेतन ४१. अभिप्राय ४२. तांब्या, लोटा ४४. लग्नात वधूवरांचे पुष्पहार ४७. वरवरची बोळवण ४८. भगवान शंकराचे धनुष्यधारी रूप ४९. जमा आणि खर्च यांची बरोबरी ५१. लिखाण ५२. अतिशय कष्ट, परिश्रम ५३. एक चपळ प्राणी, चानी ५६. काळोखी रात्र ६१. वाईट सवय ६३. किराणा माल ६४. पापी लोकांचे मरणोत्तर स्थान ६६. वेगळे होणे ६८. नाट्यकलाकार ६९. गावात पाणी भरण्याची जागा ७०. सूर्याभोवती फिरणारे गोल; मनातील समजूत ७२. सत्तावीसपैकी चौदावे नक्षत्र ७३. थांगपत्ता ७६. जमीन ७७. लज्जित, ओशाळलेला ८०. धूप जाळण्याचे भांडे ८२. सीमा ८३. स्तुती ८५. फळांचा राजा ८७. फुरसत ८९. खेद, विलाप ९०. प्रखर, तिखट ९१. इंग्रजीत लोणी ९२. चारशे ऐंशी कागद ९३. मराठी अकरावा महिना ९४. गावाची सीमा ९६. शांत ९७. पत्त्यांचा जुगार •

**नवाकाळ कोडे क्रमांक १४५४ चे उत्तर**

**आडवे शब्द** : ३. काटवट ६. अक्रोड ८. बक्षीस ११. सिकंदर१४. कजाग १६. मर्कट १७. रजई १९. धाप लागणे २०. जमदाड २१. वारंवार २३. रावा २४. स्थानक २५. बंदी २८. बला ३०. तसू ३२. दयिता ३३. ओबडधोबड ३८. परीक्षक ३९. दुवा ४०. शर ४१. बालकांड ४३. काजवा ४४. सांजा ४५. शहाणीव ४७. गत ४९. जस्त ५०. खुबा ५१. शहाणा ५२. शिक्षा ५३. वाभाडे ५४. उणे ५५. इमारत ५७. ज्येष्ठ ५८. वेस ५९. लाभ ६१. कजाग ६३. जड ६४. ताव ६५. जय विजय ६८. शिवार ७०. सनसनाटी ७२. चरा ७३. जमाव ७५. कन्यादान ७६. रवा ७८. परज ७९. नत ८०. कूर्म ८१. जंबो ८३. जवस ८५. माथा ८६. बदल ८८. अन्यत्र ९०. लवलेश ९१. रदन ९३. हरीण ९४. कोळी ९५. योद्धा ९७. बत्ती ९८. कपार १००. मद १०१. धाम १०३. हुत १०४. फोलपट १०६. तुटवडा १०७. नशीबवान १०९. शान ११०. कच्छ १११. जून ११२. स्वीकार

**उभे शब्द** : १. असिधारा २. बदला ४. टग्या ५. टकमक ७. डमरू ८. बटवा ९. सरवा १०. भुई १२. कंपवात १३. रगड १५. जादा १८. जरब २०. जनता २२. रंभा २४. स्थायिक २६. दीडशहाणा २७. बोंब २९. लाली ३१. सूप वाजणे ३२. दक्षता ३३. ओवा ३४. धोरणी ३५. डबा ३६. एकांतवास ३७. शिकारा ३९. दुजा ४२. लग ४४. सांबार ४५. शहाजोग ४६. वशिष्ठ ४८. बडेजाव ५०. खुमारी ५४. उभयचर ५६. तकवा ५७. ज्येष्ठा ५८. वेडसर ५९. लाज ६०. शेज ६२. जारकर्म ६३. जन ६४. ताटी ६६. विराजमान ६७. यजन ६८. शिव ६९. औदासिन्य ७१. नावाजलेला ७४. मातबरी ७७. दास ७८. पसार ८०. कूल ८२. बोल ८४. वश ३६. दणकट ८८. अळी ८९. त्रयोदशी ९२. दलाल ९३. हत्ती ९४. कोरडा ९६. पतन ९७. बट ९९. पावक १००. मनन १०१. धावा १०२. मनस्वी १०३. हुशार १०४. फोटो १०५. पल्ला १०६. तुच्छ १०८. बट्टा

# नाशिक पालिका व वृक्षप्रेमींची बैठक निष्फळ

पान १ वरून

अधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले की, एमआयसीई हब या विकास प्रकल्पाच्या नावाखाली आम्ही कोणतेही झाड तोडणार नाही. त्याचबरोबर पर्यावरणप्रेमींना माहिती दिल्याशिवाय प्रशासन रात्री कोणतेही झाड तोडणार नाही. वृक्षतोडीवर हरकत घेणाऱ्या सर्वांना टप्प्याटप्प्याने बैठकीला बोलावणार आहोत. परंतु आंदोलकांचे म्हणणे आहे की, १२ नोव्हेंबरला पालिकेने एमआयसीई हबसाठी झाडे तोडणार असल्याची नोटीस दिली होती. जर त्यांना झाडे तोडायची नव्हती तर त्यांनी लोकांना एमआयसीई हबबद्दल का सांगितले? यापूर्वी जी ऑनलाईन बैठक झाली त्यामध्ये त्यांनी साधुंसाठी तंबू उभारण्याबाबत कोणतेही नियोजन सांगितले नाही. त्यामध्ये मल्टीलेव्हल पार्किंग, ट्रक टर्मिनल आणि एमआयसीई हबबाबत चर्चा झाली होती. साधुग्रामसाठी जागा घेण्यासाठी सर्व सुरू असल्याचे सांगितले जाते. परंतु बैठकीत किंवा टेंडरमध्ये त्याबाबत कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे पालिकेचे नक्की काय सुरू आहे ते समजत नाही. प्रशासन एमआयसीई हबमध्ये साधुग्राम उभारणार आहे का? परंतु हबची जागा विकासासाठी आरक्षित आहे. झाडांना हात न लावता प्रशासनाला काय विकास करायचा तो त्यांनी करावा. ही एवढीच आमची मागणी मांडली. कुंभमेळ्याला कोणाचाही विरोध नाही. प्रशासनाने विनाश करून कोणताही विकास करू नये. त्यांनी काही झाडे तोडावी लागतील असे सांगितले. त्याबाबत माहिती प्रशासनाकडे उपलब्ध नाही. त्यांनी आम्हाला सर्वेक्षण करत असल्याचे सांगितले. १५ हजार झाडे वृक्षलागवड संदर्भात आजच्या बैठकीत कोणतीही चर्चा झाली नाही.

कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी आज सांगितले की, मी हैदराबाद येथून जी १५ हजार झाडे आणली आहेत त्यातील १ टक्का सुद्धा झाडे मरणार नाही. दोन वर्षांमध्ये तेथे अशी वनराई होईल नाशिककरांसाठी ते पर्यटनस्थळ होईल. १५ हजार झाडांतील २००-३०० झाडे खराब झाली तरी आम्ही त्या बदल्यात हजारो झाडे लावत आहोत. कुंभमेळा आपल्या सर्वांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. वृक्षप्रेमी आणि नाशिककरांची जी भूमिका आहे तीच आमची भूमिका आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेल्या सूचनानुसार आम्ही आधी एकही झाड तोडणार नाही. १२ वर्षांपूर्वी साधुग्रामसाठी जेवढ्या राहुट्या टाकल्या होत्या त्यापेक्षा एक फुटही जागा जास्त घेणार नाही. ती साधुग्रामसाठी आरक्षित जागा आहे. त्यामुळे मागील ८-१० वर्षांत जी झाडे वाढली आहे त्यांना मुळापासून काढून त्याचे दुसरीकडे पुनर्रोपण करणार आहोत. याशिवाय हैदराबादहून देशी प्रजातीची १५ हजार झाडे आणण्याचे काम सुरू झाले आहे. नाशिककरांना विश्वास देतो की, ज्या तुमच्या भावना आहेत त्याच शासनाच्या भावना आहेत. परंतु यामध्ये कोणी राजकारण करू नये, अशी विनंती आहे. राज ठाकरे, उद्धव ठाकरे किंवा अन्य ज्यांच्या तक्रारी आहेत त्या सर्वांना मी जाऊन भेटणार आहे. त्यांची शंका निवारण करणार, १५ हजार झाडे लावणार, लोकांनी ती बघावी, त्यानंतर आम्ही झाडे तोडण्याबाबत विचार करू.कोणत्याही विकासकाला जागा देण्याचा शासनाचा घाट नाही. आम्ही झाडे तोडून कुठेच शेड किंवा बांधकाम उभारणार नाही. अधिवेशनात सभागृहात याबाबत प्रश्न आल्यास आम्ही नक्कीच त्याबाबत निवेदन करू. मुख्यमंत्री आणि शासनाची वृक्षतोड करून पर्यावरणाचा ऱ्हास करण्याची भूमिका नाही.

# जशास तसे प्रत्युत्तर देऊ जैन मुनींचा राज ठाकरेंना इशारा



■ मुंबई

**दादरच्या** कबुतरखाना प्रकरणावरून जैनमुनी निलेशचंद्र यांनी राज ठाकरेंना तुम्ही जसे कराल तसेच प्रत्युत्तर आम्ही देऊ, असा इशारा दिला. याशिवाय कबुतरांना खाद्य देण्यास परवानगी न मिळाल्यास निवडणुकीत कोणालाही मत देणार नाही, असा इशाराही निलेशचंद्र यांनी दिला.

जैनमुनी निलेशचंद्र म्हणाले की, महाराष्ट्रात काही अडचण आली तर जैन समाज पहिला उभा असतो. सर्वात जास्त धनादेश हा जैन समाजकडून दिला जातो. जोपर्यंत दादरच्या कबुतरखान्यावरील ताडपत्री हटत नाही तोपर्यंत जैन समाज निवडणुकीमध्ये कोणालाही मत देणार नाही. महाराष्ट्राची जनता राज ठाकरे यांचा सन्मान यासाठी करते कारण ते महाराष्ट्राच्या जनतेसाठी स्वतः पुढाकार घेतात.

राज ठाकरे यांनी आमच्या जैन समाजाशी चर्चा करावी. तुम्ही जे सांगाल ते आम्ही करू. पण तुम्ही म्हणाल की, मारवाडीला थोबाडीत मारा. आम्ही आता सहन करणार नाही. आम्ही संघटित राहणार. आजपासून आम्ही प्रत्येक इमारतीत जाऊन पशू, प्राणीमात्रांसाठी जनजागृती करणार. जसे गौरक्षक आहेत तसे कबुतर रक्षक तयार करत आहोत. जेवढा सन्मान तुम्ही मराठी भाषेचा करता त्यापेक्षा जास्त आम्ही मारवाडी भाषेचा करतो. महाराष्ट्रने आम्हाला दिले तेवढे आम्ही महाराष्ट्राला पण दिले. आई जरी राजस्थान असेल तरी आमची मोठी आई महाराष्ट्र आहे.

# 'सनबर्न'साठी पोर्ट ट्रस्टची जागा

पान १ वरून - घरातील कॉलेजवयीन मुलांना अमली पदार्थाच्या जाळ्यात ओढण्यासाठी खास व्यवस्था सनबर्नमध्ये केली जात असल्याचा आरोप असल्यामुळे गोव्यात आणि पुण्यात सनबर्नला तीव्र विरोध झाला. गोवा राज्याचा ६ कोटी २९ लक्ष रुपयांचा कर सनबर्नने चुकवला आहे. महाराष्ट्रात अवैध उत्खनन केले म्हणून महसूल विभागाने ६० लाख रुपयांचा दंड ठोठावला तोही सनबर्न बुडवला आहे. अश्लीलता, अनैतिक संबंध, गुन्हेगारी आदींचे प्रमाण या फेस्ट मध्ये अधिक आहे. त्यामुळे या फेस्टिव्हलने कोवळ्या मुलांचा जीव घेतला आहे. मात्र राज्य शासन कराच्या अल्पशा रकमेसाठी मुंबईकरांना वेठीस धरत आहे. एवढा विरोध असताना 'सनबर्न'ला मुंबईत अनुमती कशी मिळते, असा सवालही नशा विरोधी संघर्ष अभियानाने केला आहे. याबाबत गृहविभाग, मुंबई पोलीस, जिल्हाधिकारी, बाल हक्क आयोग, अमली पदार्थ विभाग यांना लेखी तक्रार केली आहे. मात्र त्यांच्याकडून कोणतीही कारवाई झालेली नाही. सरकारने सनबर्न फेस्टिव्हलवर बंदी घातली नाही तर आम्ही प्रत्यक्ष कार्यक्रम स्थळी घुसून सनबर्न बंद पाडू, असा सज्जड इशारा नशा विरोधी संघर्ष अभियानाने सरकारला दिला आहे.

# पार्थ पवार जमीन प्रकरणी निलंबित तहसीलदाराने ८५ लाख रोख भरले

पान १ वरून

मुंढवा जमीन घोटाळ्यातील पैसे वळवण्यासाठी केला गेला का? याची स्वतंत्र चौकशी आर्थिक गुन्हे शाखा व अंमलबजावणी संचालनालय (ईडी) मार्फत केली जावी. सदर व्यवहारात कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधित आरोपी, जामीनदार, संस्थेतील जबाबदार पदाधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. या गंभीर प्रकरणातील आर्थिक बाबींमागे प्रचंड गैरव्यवहार, भ्रष्टाचार व मनी लॉड्रिंगचा संशय निर्माण होत आहे.

पुण्यातील मुंढवा भूखंड खरेदी घोटाळ्याप्रकरणी पार्थ पवार अडचणीत सापडले असून, त्यांच्या अमेडिया कंपनीवर १,८०० कोटींची महार वतनाची जमीन अवघ्या ३०० कोटी रुपयांत घेतल्याचा आरोप आहे. शिवाय या व्यवहाराची केवळ ५०० रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी मूळ वतनदारांची कुलमुखत्यारपत्र तयार करणाऱ्या शीतल तेजवानीला अटक केली आहे. या प्रकरणात तहसीलदार सूर्यकांत येवले यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असतानाच सूर्यकांत येवले यांनी आपल्या कुटुंबियांच्या नावे असलेली सुमारे ८५.५० लाख रुपयांची थकबाकी रोख स्वरूपात भरल्याचे उघड झाल्याने त्यांच्याबाबत संशय आणखी बळावला आहे. या प्रकरणातील आरोपी पार्थ पवार यांचे मामेभाऊ यांची उद्या चौकशी होणार आहे.


## महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११००१**

**दुरध्वनी क्रमांक** ०२० / २६१२२४८५ **व** २६१२२४१४ **फॅक्स क्र.** ०२०/२६१२२४८५

**Web- www.mahapwd.com & e-mail - pune.ee@mahapwd.com**

**भांडार - ई-निविदा सूचना क्रमांक १२ सन २०२५-२०२६**

**कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १** (दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२४८५/२६१२२४१४) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी-२०१७/प्र. क्र. ८ / इमा-२, दिनांक १२/४/२०१७व शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी /२०१७ /प्र.क्र. ८ / इमा-२, दिनांक २९/६/२०१७ अन्वये कॅन्टीन चालविण्याचा चांगला अनुभव असलेल्या आणि कॅन्टीन चालविण्याचा शॉपअॅक्ट असणाऱ्या व वरील शासननिर्णयानुसार असलेल्या व्यक्ती अथवा संस्था यांचेकडून विधानभवन पुणे येथील इमारतीच्या आवारातील कॅन्टीन खाजगीरित्या चालविणेसाठी भाडे तत्वावर ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत.

निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| कामाचे नांव | १. | विधानभवन पुणे येथील इमारतीच्या आवारातील कॅन्टीन खाजगीरित्या चालविणेसाठी भाडे तत्वावर देणेबाबत. (Running Canteen in the Primises of Council Hall at Pune.) |

| | | |
|---|---|---|
| अंदाजित किंमत | १. | ३,१६,१४०/- (**१२ महिने**) |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी/ ऑनलाईन विक्री कालावधी | : | **दिनांक ०९.१२.२०२५ सकाळी १०.०० वा. ते दिनांक १६.१२.२०२५ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत.** |
| निविदा पुर्व चर्चा बैठक | : | **--निरंक--** |
| ऑनलाईन निविदा सादर करावयाचा कालावधी | : | **दिनांक ०९.१२.२०२५ सकाळी १०.०० वा. ते दिनांक १६.१२.२०२५ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत.** |
| तांत्रिक व आर्थिक ई निविदा ऑनलाईन उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | : | **कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पुणे यांचे कार्यालयात दिनांक १८.१२.२०२५ रोजी सकाळी १०.०० पासून (शक्य झाल्यास)** |
| निविदा हार्ड कॉपी (hard copy) सादर करण्याचे ठिकाण दिनांक व वेळ | : | **ई निविदा पोर्टलवर निविदा सादर केल्यानंतर (बीड लॉक) झाल्यानंतर निविदाबाबतची हार्ड कॉपी १ प्रतीत (तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा) सिलबंद लखोट्यामध्ये दिनांक १६.१२.२०२५ दुपारी १५.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पुणे यांचे कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.** |
| | | |

| अ. क्र. | कामाचे नाव | इसारा/ बयाणा रक्कम | अनामत रक्कम | कॅन्टीन चालविण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | विधानभवन पुणे येथील इमारतीच्या आवारातील कॅन्टीन खाजगीरित्या चालविणेसाठी भाडे तत्वावर देणेबाबत. (Running Canteen in the Primises of Council Hall at Pune.) | ३५००/- | ३५००/- | १ वर्ष | ५००/- GST १८% ५९०/- |

खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. web - www.mahapwd.com (फक्त निविदा सुचना)
२. http://mahatenders.gov.in
**(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल.)**
३.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे -१ मध्यवर्ती इमारत आवार, पुणे या कार्यालयातील सुचना फलक

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पुणे- ४११००१.**

जिमाका/पुणे/जाहिरात/६१७/२०२५-२६


# आदित्य ठाकरेंना विरोधी पक्षनेतेपद?

पान १ वरून

हस्तक्षेप नसतो. विरोधकांकडे संख्याबळ नसल्याने ते विरोधी पक्षनेतेपदावर हक्क सांगू शकत नाहीत.

विरोधी पक्षनेतेपदासाठी गेले काही दिवस भास्कर जाधव यांचे नाव चर्चेत असताना आता अचानक आदित्य ठाकरे यांचे नाव कसे पुढे आले आहे, याबद्दल आज विधान भवन परिसरात आश्चर्य व्यक्त केले जात होते. आदित्य ठाकरे हे आक्रमक भूमिका घेतात. ते तरुणांत लोकप्रिय आहेत. राज्यभरातील आंदोलनांत सक्रिय सहभागी असतात. या कारणांमुळे त्यांचे नाव पुढे आणले गेल्याचे बोलले जात आहे. मात्र, हा भास्कर जाधवांसाठी मोठा धक्का ठरणार आहे. यावरून मंत्री उदय सामंत यांनी भास्कर जाधव यांना कोपरखळी मारली. ते म्हणाले की, जाधवसाहेब आक्रमक नेते आहेत. ते पक्ष बदलण्याचा विचार करू शकतात, म्हणून त्यांना शांत ठेवण्यासाठी विरोधी पक्षनेतेपदाचे आश्वासन देण्यात आले आहे. परंतु अंतिम निवड होताना त्यांचा विचार केला जाण्याची शक्यता कमी आहे.

तर सत्ताधारी शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई यांनी आदित्य यांच्या नावाला कडाडून विरोध केला. ते म्हणाले की, आदित्य यांना विरोधी पक्षनेतेपद मिळाले तर २०१९ मध्ये शिवसेना आमदारांना जो अनुभव आला, तोच अनुभव आता ठाकरे गटाच्या आमदारांना येईल. विरोधी पक्षपदावरून टीकाटीपण्णी झाल्यानंतर आदित्य ठाकरे यांनी आपण विरोधी पक्षनेतेपदाच्या शर्यतीत नसल्याचे स्पष्ट केले आहे. ते म्हणाले की, मला विरोधी पक्षनेतेपद देण्याची बातमी पेरलेली आहे. अफवांवर विश्वास ठेवू नका. दरम्यान, मविआ नेते उद्या दोन्ही सभागृहांतील विरोधी पक्षनेतेपदासाठी विधानसभा आणि विधान परिषद अध्यक्षांची भेट घेणार आहेत.

# नवी मुंबई विमानतळाच्या नावासाठी भूमिपुत्रांची २२ डिसेंबरपासून दिंडी

पान १ वरून

पार करून ऐरोली येथे मुक्काम केला जाईल. दिंडीत सहभागी महिलांसाठी सायंकाळी घरी परतण्यासाठी बसची व्यवस्था करण्यात येणार आहे. २३ डिसेंबर रोजी ऐरोलीहून दिंडी पुन्हा मार्गस्थ होऊन १५ किमी अंतर पार करत सीबीडी बेलापूर येथे मुक्काम करील. २४ डिसेंबर रोजी अंतिम टप्प्यात रायगड, ठाणे, पालघर व मुंबई जिल्ह्यातील भूमिपुत्र हजारोंच्या संख्येने सहभागी होऊन विमानतळ परिसरात एकत्र येणार आहेत.

खा. म्हात्रे म्हणाले, दि.बा. पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव सव्वातीन वर्षांपासून प्रलंबित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधानांनी सहमती दर्शवली असल्याचे सांगितले. तरीही निर्णय होत नसल्याने संभ्रम आहे.

नवा काळ

• पुणे । मंगळवार ९ डिसेंबर, २०२५ • पान -८

# डॉलरच्या तुलनेत रुपया सोळा पैशांनी घसरला



**मुंबई -** अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाची गेल्या काही दिवसांपासून सातत्याने घसरण होत आहे. आज रुपया आणखी १६ पैशाने घसरून एका डॉलरला ९० रुपये ११ पैसे एवढ्या नीचांकी पातळीवर पोहोचला. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ आणि परकीय गुंतवणूकदारांकडून लावण्यात आलेला भारतातील गुंतवणूक काढून घेण्याचा सपाटा या दोन प्रमुख कारणांनी रुपयामध्ये घसरण झाली, असे तज्ज्ञांनी सांगितले. उद्या किंवा परवा (९ किंवा १० डिसेंबर) अमेरिकेच्या फेड रिझर्व्हचे पतधोरण जाहीर होणार आहे. यावेळी फेड व्याजदरात कपात करेल, असा नव्वद टक्के गुंतवणूकदारांचा अंदाज आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांनी सध्या सावध पवित्रा घेतला आहे. त्याचा परिणामही रुपयाच्या किमतीवर झाला आहे, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

# एक खडूची खूण.........

**औद्योगिक इतिहासात काही प्रसंग असे असतात जे केवळ तांत्रिक कौशल्य नव्हे, तर मानवी बुद्धिमत्तेचे मूल्य सिद्ध करतात. १९२०च्या दशकातील डिअरबॉर्न, मिशिगनमधील प्रसिद्ध वाहन उत्पादक हेन्री फोर्ड यांच्या भल्या मोठ्या उत्पादन कारखान्यात एक घटना घडली आणि सर्वांनाच मोठा धडा दिला.**



**फोर्ड** कंपनीतील महाकाय जनरेटर अचानक बंद पडला. संपूर्ण उत्पादन लाईन ठप्प झाली. तासागणिक दहा-दहा हजार डॉलरचा आर्थिक फटका बसत होता. पन्नास अत्युत्तम अभियंते अनेक दिवस जनरेटरची तपासणी करत राहिले. पॅनेल उघडले, सर्किट तपासले, आराखडे चेक केले. परंतु जनरेटर जिवंत होईना.

शेवटी एका नावावर सर्वांची नजर थांबली. चार्ल्स प्रोटियस स्टाईनमेट्झ! हा विद्युत अभियांत्रिकीतील महान प्रतिभावंत तज्ज्ञ म्हणून विख्यात होता. स्टाईनमेट्झला बोलावण्यात आले. तो कारखान्यात आला. त्याने यंत्र उघडले नाही. कुणालाही काहीही आदेश दिले नाहीत. फक्त एक खुर्ची, एक वही मागितली. पूर्ण शांतता ठेवण्यास सांगितले. तो अनेक तास शांत बसून जनरेटरकडे पाहत राहिला. तो काही ऐकत आहे असे वाटत होते. कधी तो जनरेटरच्या जवळ जाऊन निरीक्षण करायचा, कधी स्पर्श करायचा. फोर्डचे अभियंते पाहत होते. त्यांना वाटत होते की, तो काही करतच नाही. पण प्रत्यक्षात, तो करत होता तीच गोष्ट जी इतर पन्नास अभियंत्यांना जमलेली नव्हती. तो विचार करत होता.

शेवटी, तो उठला आणि म्हणाला, मला खडूचा एक तुकडा हवा आहे. त्याने जनरेटरवर एक फुल्ली मारली. तो म्हणाला, मशीन हे इथे उघडा. आतील तुटलेल्या भागापासून सोळावे वळण असलेली कॉईल बदला. अभियंत्यांनी सांगितल्याप्रमाणे केले आणि अगदी तिथेच शॉर्ट झालेली कॉईल निघाली. ती बदलताच जनरेटर जिवंत झाला. उत्पादन पुन्हा सुरू झाले. सर्वांच्या जीवात जीव आला. काही दिवसांनी स्टाईनमेट्झने फोर्डला त्याच्या कामाचे १०००० डॉलरचे बिल पाठवले. फोर्ड व्यावसायिक होता. त्याने बिल बघितले. एक फुल्ली मारणाऱ्याचे १० हजार डॉलरचे बिल? त्या काळात ही रक्कम मोठी होती. त्याने स्टाईनमेट्झ यांना पत्र पाठवले, तुम्ही बिल पाठवले त्यात तुम्ही केलेल्या खर्चाचा तपशील द्या. याला स्टाइनमेट्झने दिलेले उत्तर इतिहासात अजरामर झाले. त्यांनी म्हटले, एक खडूने खूण करण्याचा खर्च १ डॉलर, ती खूण नेमकी कुठे करायची हे जाणण्याची किंमत ९,९९९ डॉलर!!

हेन्री फोर्डने ते उत्तर वाचून क्षणाचाही विलंब न करता पूर्ण बिल भरले. कामाचे मोजमाप किती वेळ लागला? या मापदंडाने केले जाते. पण स्टाईनमेट्झचा धडा सांगतो की, आपण वेळ विकत घेत नाही. आपण अनुभव विकत घेतो. चार्ल्स स्टाईनमेट्झ १९२३ मध्ये मरण पावले. त्यांची ती एक साधी खडूची खूण एक अमूल्य धडा देऊन गेली. खडूची किंमत १ डॉलर, पण खरी किंमत कशाची ते कळायला हवे. ◆◆◆

# राज्यातील शिक्षकांचे टीईटी विरोधात परिपाठ आंदोलन

■ मुंबई




**राज्य** शासनाने टीईटी संदर्भात तातडीने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी, जुनी पेन्शन लागू करावी, अशा प्रमुख मागण्यांसाठी राज्यातील शिक्षकांनी आदर्श शिक्षक समितीचे अध्यक्ष दिलीप ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली आज मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन केले. यावेळी मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.

राज्य सरकारच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आदर्श शिक्षक समितीने हे आंदोलन करत आपल्या मागण्या लावून धरल्या. यावेळी १५ मार्च २०२४ची सुधारित संच मान्यता शासन निर्णय रद्द करावा, विद्यार्थ्यांचा जन्म २०२०च्या पूर्वी झालेला असल्यास जन्मनोंदणी ऑफलाईन पध्दतीने घ्यावी, आधार कार्ड आधारित संच मान्यता करू नये, जुनी पेन्शन योजना लागू करावी, शिक्षण सेवक योजना रद्द करावी, कार्यरत शिक्षकातून ५० टक्के केंद्रप्रमुख पदे भरताना शिक्षकांची सेवा ज्येष्ठता ग्राह्य धरावी, अशा मागण्या सरकारकडे केल्या.

# गुजराती, मराठी वाद व्हिडिओ व्हायरल

■ मुंबई

**मुंबईत** मराठी विरूद्ध इतर भाषा या वादाची आणखी घटना समोर आली आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये एक मराठी माणूस गाडी चालवत असलेल्या व्यक्तीला मराठीत बोला असे सांगतो. त्यावर तो उद्दामपणे म्हणतो की, मै गुजराती हुँ, मराठी नही बोलुंगा! भारत मे मराठी भाषा नहीं, हिंदी भाषाही चलेगी. हा व्हिडिओ नेमका कुठला किंवा कधीचा याबद्दल काही माहिती या व्हिडिओमधून मिळत नाही.

# पंढरपुरात विठ्ठल-रुक्मिणीची पाद्यपूजा ११ दिवस बंद राहणार

■ सोलापूर

**पंढरपूरच्या** श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील पाद्यपूजा भाविकांसाठी ११ दिवसांसाठी बंद ठेवण्याचा



निर्णय मंदिर समितीने घेतला आहे. येत्या २१ ते ३१ डिसेंबरदरम्यान पाद्यपूजा बंद राहणार आहे. नाताळ आणि वर्षाखेरीच्या सुट्ट्यांमुळे पंढरपुरातील भाविकांची प्रचंड गर्दी वाढणार असल्याने दर्शन रांगेतील भाविकांना सुलभ आणि जलद दर्शन मिळावे या हेतूने हा निर्णय घेतल्याचे मंदिर समितीने स्पष्ट केले.

पाद्यपूजेच्या माध्यमातून भाविकांना थेट विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणांवर पूजा करण्याची संधी मिळते. पाद्यपूजेसाठी पाच हजार रुपये देणगी आकारली जाते. मात्र गर्दीचा ताण आणि व्यवस्थापनातील अडचणी लक्षात घेता सलग अकरा दिवस पाद्यपूजा बंद ठेवण्यात येणार आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास सरकारी नोकरी?

■ मुंबई

**राज्यात** बिबट्याच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. या हल्ल्यांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना थेट सरकारी नोकरी देण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याची माहिती आहे.

बिबट्या किंवा वाघाच्या हल्ल्यांमध्ये कुटुंबातील कर्ता व्यक्ती दगावल्याने अनेक घरांची आर्थिक घडी विस्कटून मुलांचे शिक्षण, घरखर्च, कर्ज आणि शेतीची जबाबदारी अचानक कोसळल्याने कुटुंबांना मोठा फटका बसतो. सरकारकडून देण्यात येणारी आर्थिक मदत तात्पुरती ठरत असून, दीर्घकालीन आधाराची गरज आहे, हे शासनाच्या निदर्शनास आल्याने नोकरीची हमी देण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. यावर शासनपातळीवर गांभीर्याने विचार सुरू असून लवकरच याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.

# विनापरवाना बाईक-टॅक्सी सेवा ओलाच्या संचालकांवर गुन्हा दाखल

■ मुंबई

**विना**परवाना बाईक-टॅक्सी सेवा चालविल्याबद्दल मुंबई पोलिसांनी रॅपिडोनंतर आता ओलाच्या संचालकांविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे.

## आंबोली पोलिसांची कारवाई

मुंबई प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) दिलेल्या तक्रारीवरून आंबोली पोलिसांनी हा गुन्हा दाखल केला आहे. ओलाकडे मुंबईत बाईक-टॅक्सी चालवण्याचा वैध परवाना नाही. प्रवाशांच्या सुरक्षाविषयक नियमांचे तसेच भारतीय न्याय संहिता आणि वाहतूक नियमांचे ओलाने उल्लंघन केले आहे. बाईक टॅक्सीसाठी चालकाची नेमणूक करताना ओलाकडून चालकाची पार्श्वभूमी तपासली जात नाही, असे आरोप पोलिसांनी ठेवले आहेत.

आरटीओकडून रॅपिडो आणि ओलाच्या बाईक टॅक्सींविरोधात ११ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर या कालावधीत दंडात्मक कारवाई केली होती. त्यानंतर ५ डिसेंबर रोजी प्रादेशिक परिवहन अधिकारी बाबू तेली यांनी अंधेरी पश्चिम येथील आंबोली पोलिसांत तक्रार नोंदवली आहे.

# अभिनेत्रीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी अभिनेता दिलीपची निर्दोष मुक्तता

■ तिरुअनंतपूरम

**मल्याळम** चित्रपटसृष्टीतील एका प्रसिद्ध अभिनेत्रीवर सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणीच्या खटल्यात न्यायालयाने अभिनेता दिलीप याची आज निर्दोष मुक्तता केली. तर या खटल्यातील मुख्य आरोपी सुनील एन.एस. उर्फ पल्सर सुनी याच्यासह अन्य पाच आरोपींना दोषी ठरवले.

१७ फेब्रुवारी २०१७ रोजी पीडित अभिनेत्री त्रिशूरमध्ये चित्रीकरणासाठी जात असता पाच-सहा जणांच्या टोळक्याने तिचे अपहरण करून धावत्या गाडीत तिच्यावर सामूहिक अत्याचार केला. तसेच त्यांनी या घटनेचे व्हिडिओ चित्रीकरण केले. पीडित अभिनेत्रीने पोलिसांत दिलेल्या तक्रारीमुळे हे प्रकरण उघड झाले.

घटनेच्या दुसऱ्याच दिवशी गाडीचा चालक मार्टीन अँटोनी याला पोलिसांनी अटक केली. त्याच्या जबानीतून आठवडाभरात पोलिसांनी सराईत गुन्हेगार पल्सर सुनी याला अटक केली. त्यानंतर महिनाभरात अन्य चार आरोपींना अटक झाली. जुलै २०१७ मध्ये अभिनेता दिलीप याला या प्रकरणात अटक होताच संपूर्ण राज्यात खळबळ माजली होती. पीडितेने दिलीपच्या विवाहबाह्य संबंधांची माहिती त्याच्या पत्नीला दिली होती. त्याचा सूड उगवण्यासाठी दिलीपनेच कट आखून अभिनेत्रीवर सामूहिक अत्याचार घडवून आणला, असा आरोप ठेवत पोलिसांनी त्याला अटक केली. ८३ दिवस कोठडीत राहिल्यानंतर ऑक्टोबर २०१७ मध्ये त्याची जामिनावर सुटका झाली होती.

# नीलेश राणे-रवींद्र चव्हाणांची गळाभेट

■ नागपूर

**मालवणमधील** नगरपरिषदेच्या निवडणुकीदरम्यान शिंदे गटाचे आमदार नीलेश राणे आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यातील वाद रंगला होता. या वादातूनच नीलेश राणे यांनी आपले बंधू नितेश राणे यांच्यावरही टीका केली होती. त्यामुळे निवडणूक काळातच वातावरण चांगलेच तापले होते. मात्र, निवडणुका संपताच या दोघांतील वादावर पडदा पडला असून, नागपुरात विधान भवन परिसरात आज नीलेश राणे व रवींद्र चव्हाण समोरासमोर आले. यावेळी दोन्ही नेत्यांनी हसतखेळत संवाद साधला आणि हस्तांदोलन करून एकमेकांची गळाभेट घेतली. भेटीनंतर नीलेश राणे म्हणाले की, माझे आणि रवींद्र चव्हाण यांचे काहीही वितुष्ट

**वादावर पडदा**



नाही. जे काही झाले ते निवडणुकीपुरते होते. रवींद्र चव्हाण माझ्या मोठ्या भावासारखे आहेत.

# मिलिंद साठे राज्याचे नवीन महाधिवक्ता



■ नागपूर

**राज्याचे** महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांच्या राजीनाम्यानंतर राज्य मंत्रिमंडळाने नवे महाधिवक्ता म्हणून वरिष्ठ विधिज्ञ मिलिंद साठे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत त्यांच्या नावावर सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

बिरेंद्र सराफ यांनी सप्टेंबर २०२५ मध्ये वैयक्तिक कारणांमुळे राजीनामा दिला होता. पुढील व्यवस्था होईपर्यंत कामकाज पाहण्याची विनंती सरकारकडून करण्यात आली होती आणि त्यांनी सरकारच्या विनंतीचा मान राखत आजपर्यंत आपली जबाबदारी पार पाडली.

मिलिंद साठे यांचा विधी क्षेत्रातील मोठा अनुभव हा त्यांच्या नियुक्तीमागील प्रमुख आधार मानला जात आहे. त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात अनेक वर्षे वरिष्ठ वकील म्हणून काम केले असून, न्यायालयीन प्रक्रियेची त्यांना उत्तम जाण आहे.

# वसई-विरार पालिका निवडणूक एमआयएम लढवणार इम्तियाज जलील यांचे जोरदार शक्तिप्रदर्शन

■ वसई

**आगामी** वसई-विरार महापालिकेची निवडणूक लढविण्याचा निर्णय ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादून मुसलमीन (एआयएमएआयएम) पक्षाने घेतला आहे. त्याची तयारी म्हणून पक्षाचे नेते इम्तियाज जलील यांनी रविवारी वसईत जोरदार शक्तिप्रदर्शन करत सभा घेतली.

महाराष्ट्र विधानसभेत पराभव झाला असला तरी बिहार विधानसभेच्या निवडणुकीत एमआयएम पक्षाचे ५ उमेदवार निवडून आले होते. त्यामुळे पक्षाचा आत्मविश्वास वाढला असून, त्यांनी आता वसई-विरार महापालिकेची



निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी पक्षाने चाचपणी सुरू केली आहे. रविवारी पक्षाचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत जाहीर सभा घेतली. देशात होत असलेल्या अन्यायाचे दाखले देत त्यांनी मुस्लीम मतदारांना साद घातली. धर्मनिरपेक्ष म्हणवून घेणारे पक्ष स्वत:च्या फायद्यासाठी मुस्लीम मतदारांना वापरून घेत आला आहे. त्यामुळे सर्वांनी एक होऊन आपली ताकद दाखवा, असे आवाहन त्यांनी केले. भाजपा हा सर्वांचा राजकीय शत्रू असल्याने बहुजन विकास आघाडीने सोबत येऊन युती करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

आम्ही शहरात आमच्या पक्षाचे जाळे तयार केले आहेत. त्यामुळे काही जागांवर आम्ही निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. जर बहुजन विकास आघाडीने युती केली तर ठिक आहे अन्यथा आम्ही स्वबळावर काही जागा लढवून जिंकून आणू, असा विश्वास पक्षाचे जिल्हाध्यक्ष अमर पटेल यांनी व्यक्त केला.

# हिमाचलमध्ये तापमानवाढ शेती-पर्यटनासाठी घातक

■ शिमला

**हिमाचल** प्रदेशात डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात तापमानात अनपेक्षित वाढ झाली आहे. राज्यातील किमान तापमानात १.४ आणि कमाल तापमानात १.९ अंशांनी वाढ नोंदवण्यात आली आहे. अनेक ठिकाणी रात्रीचे तापमान सुमारे ६ अंशांनी वाढले आहे. हे वातावरण सफरचंद पीक आणि पर्यटनासाठी घातक असते. मनालीचे किमान तापमान सामान्य तापमानापेक्षा तब्बल ५.९ अंशांनी जास्त नोंदवले आहे. शिमल्यातही ३.२ अंशांनी तापमान वाढले आहे. कल्पामध्ये ३.४ आणि भुंतरमध्ये ३.८ अंशांची वाढ झाली आहे. हवामान विभागानुसार १४ डिसेंबरपर्यंत राज्यात आकाश स्वच्छ राहण्याचा अंदाज आहे. या काळात पाऊस किंवा बर्फवृष्टी होण्याची शक्यता नाही. तापमानातील अचानक वाढीमुळे पर्यटन, शेती आणि पर्वतीय भागातील रहिवाशांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

# सातवीच्या पुस्तकात गझनीच्या लुटमारीवर धडा

**राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) तयार केलेल्या सुधारित अभ्यासक्रमात इयत्ता सातवीच्या सामाजिक विज्ञानाच्या पुस्तकातील गझनीच्या महंमदावरील धड्याचा विस्तार करून त्याने भारतावर कसे आक्रमण, किती विध्वंस आणि लुटमार केली याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.**

■ नवी दिल्ली

**इयत्ता** सातवीच्या जुन्या पुस्तकात गझनीच्या महंमदवर फक्त एक परिच्छेद होता. या परिच्छेदात गझनीने केलेल्या १७ चढायांची संक्षिप्त माहिती देण्यात आली होती. नव्या पुस्तकात गझनीने केलेल्या चढाया, त्याच्या सैनिकांनी केलेला रक्तपात, मथुरा आणि कनोज मंदिरांमध्ये केलेली लूट यांची सविस्तर माहिती देणारा धडा समाविष्ट करण्यात आला आहे.

या धड्याच्या सुरुवातीलाच एनसीईआरटीकडून असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे की, धड्यातील माहिती केवळ भूतकाळात काय काय घडले



याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, जेणेकरून भविष्यात अशा गोष्टींची पुनरावृत्ती होणार नाही म्हणून दिली आहे. भूतकाळातील अप्रिय घटनांच्या स्मृती पूर्णपणे पुसून टाकणे शक्य नाही. मात्र भूतकाळात घडलेल्या घटनांबद्दल आता त्या विशिष्ट समाजातील लोकांना जबाबदार धरता येणार नाही. याच एनसीईआरटीने अयोध्येतील बाबरी मशीद पाडल्यानंतर गुजरातमध्ये उसळलेल्या दंगलींवर आधारित धडा विद्यार्थ्यांच्या मनात हिंसा रूजू देऊ नये असे सांगत काढून टाकला होता. गझनीच्या महंमदाने केलेल्या अत्याचाराचे वर्णन मात्र सविस्तर देण्यात आले आहे.

# बंगालमधील बाबरीसाठी ११ पेट्या भरून देणगी

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बेलडांगामध्ये तृणमूल काँग्रेसचे निलंबित आमदार हुमायूं कबीर यांनी ६ डिसेंबर रोजी बाबरीसारख्या मशिदीची पायाभरणी केली. बाबरी विध्वंसाच्या ३३ व्या वर्षपूर्तीनिमित्त या मशिदीची पायाभरणी करण्यात आली. या पायाभरणीच्या वेळी तब्बल ११ पेट्या भरून देणगी जमा झाल्या आहेत. मशिदीसाठी जमा केलेल्या देणगीचा एक व्हिडिओ हुमायूं कबीर यांनी स्वतः फेसबुकवर शेअर केला असून, पायाभरणी समारंभात तब्बल ११ पेट्या देणगी जमा झाल्या आहेत. देणगीतील नोटा मोजण्यासाठी ३० लोक आणि नोटा मोजण्याची यंत्रे वापरण्यात येत आहेत.

# अंजली दमानिया सुपारीबाज आ. अनिल पाटलांचा आरोप



■ नागपूर

**पार्थ पवार** यांच्या कथित जमीन घोटाळ्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. यावरून राजकारण तापले असून, अजित पवार गटाचे आमदार अनिल पाटील यांनी अंजली दमानिया सुपारी घेऊन काम करत असून, त्या राष्ट्रवादी काँग्रेसला बदनाम करणाऱ्या मास्टरमाईंडच्या इशाऱ्यावर चालत आहेत, असा आरोप केला.

नागपूर येथील विधिमंडळ परिसरात अनिल पाटील म्हणाले की, आमच्या नेत्याचा राजीनामा मागणारी अंजली दमानिया कोण? त्यांना हा अधिकार कोणी दिला? कधी अजित पवार, तर कधी धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करणे आणि ज्यांची सुपारी घेतली असेल त्यांचा राजीनामा मागणे, हाच त्यांचा उद्योग आहे. पार्थ पवार प्रकरणावर स्पष्टीकरण देताना ते म्हणाले की, या प्रकरणासाठी दोन समित्या नेमण्यात आल्या आहेत. चौकशी सुरू असून, कारवाईदेखील झाली आहे. इतके सगळे होऊनही केवळ अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला बदनाम करण्याची सुपारी अंजली दमानिया यांना दिली आहे. त्या स्वतःच्या बुद्धीने चालत नाहीत, तर दुसऱ्या कुणाच्या इशाऱ्यावर आहेत. या 'मास्टरमाईंड'ची ओळख लवकरच जनतेसमोर उघड होईल.